

आणि

REFBK-0007147

# हसा आणि लठ्ठ व्हा

## भाग १ ला

लेखक :

चन्द्रकान्त काकोडकर

क्र. ५९४८

REFBK-0007147

दि महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि. मुंबई ४.

प्रकाशक
शं. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
मुंबई ४

मुद्रक
ज. वि. देसाई
राष्ट्रवैभव प्रेस,
मुंबई ४

किंमत २॥ रुपये

( १ ) सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन
( २ ) प्रथमावृत्ति ऑगष्ट १९४९
( ३ ) मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचं आहे.

# निवेदन—

ह्या संग्रहांतील माझ्या सर्व हास्यकथा "विसावा" मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. ह्या सर्वच कथा कांहीं माझ्या स्वतःच्या नाहींत. वाङ्मयचौर्याचा आळ यायला नको म्हणून हें आधींच सांगून ठेवलेलं बरं. ह्यांतील बऱ्याच कथा मी स्वतः लिहिलेल्या असून बाकीच्या सर्व परकीय भाषेंतून घेतलेल्या आहेत. तसं करतांना शक्य तों त्या कथांतील मध्यबिंदुच तेवढा मी घेतला आणि त्यावरून कथा रचल्या. "विसावा" मासिकांत ह्या हास्यकथा प्रसिद्ध होत असतांना त्या बऱ्याच वाचकांना पसंत पडल्याचं त्यांनीं कळवलं. केवळ त्यांच्या पसंतीमुळंच मी आज हा हास्य-कथांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचं धाडस करीत आहें.

चन्द्रकान्त काकोडकर

नों. १०५४७

# चन्द्रकान्त काकोडकर यांचं वाङ्मय

**प्रकाशित :—**

( १ ) निसर्गाकडे (कादंबरी)
( २ ) कुणाच्या स्वातंत्र्यासाठीं ? ,,
( ३ ) हसा आणि लठ्ठ व्हा (हास्यकथा) भाग १ ला

**आगामी :—**

( १ ) गोमन्तका जागा हो (कादंबरी)
( २ ) काल, आज आणि उद्यां ,,
( ३ ) हसा आणि लठ्ठ व्हा (हास्यकथा)
भाग २ रा

हास्याला पारखे झालेल्या सर्व दुःखी जनांना

१०५७९

# हसा आणि लठ्ठ व्हा

१०५४७

चन्द्रकान्त काकोडकर

शाखा
१०५४७

## नटीचं प्रेम ! १

अशोकनं सिनेमा सृष्टींत पाऊल टाकून पांच महिने झाले नाहींत तोंच एका नटीच्या प्रेमांत तो सांपडला. तिच्या प्रेमाच्या मोहिनीनं अशोक अगदीं पागल बनला. तिच्याशिवाय त्याला कांहींच सुचेनासं झालं. तिच्याशिवाय त्याला एक क्षणभरही करमेनासं झालं—

एक दिवस ती नटी स्टुडिओंत येतांच अशोकनं तिच्याशीं लग्नाचा विषय काढला. तो म्हणाला, "लाडके, आतां लग्नाशिवाय जिवंत रहाणं मला शक्य नाहीं. तेव्हां आपण लग्न करून टाकूं!"

"डार्लिंग, थोडे दिवस तरी आम्हांला लग्न पुढं ढकललंच पाहिजे!" ती म्हणाली.

"का? तुझं माझ्यावर प्रेम नाहीं का?" त्यानं कांहींसं संशयी मनानं विचारलं.

"डार्लिंग, असं कसं म्हणतां तुम्ही?" ती आपले दोन्ही हात त्याच्या गळ्याभोंवतीं टाकीत म्हणाली, "माझं तुमच्यावर फार प्रेम आहे. पण कालच मी दुसऱ्या एकाबरोबर लग्न केलं आहे!"

★

## तोंपर्यंत मी थांबतों! २

सेल्समनचा पेशा पत्करून बगारामला एक महिना झाला होता. दररोज निरनिराळ्या लोकांच्या घरीं जाऊन त्यांना आवश्यक त्या वस्तु तो पुरवीत असे. असाच एकदां तो एका घरीं गेला. दारावरची बेल दाबतांच दार उघडून एक सुंदर विवाहित तरुणी समोर आली. तिच्या सौंदर्यानं बगाराम अगदीं दिपून गेला. कसाबसा नमस्कार करीत तिच्या तोंडाकडे पहात बगाराम म्हणाला, "मला आपल्या पतिराजांना भेटायचं होतं!"

"ते घरांत नाहींत!" ती तरुणी अगदीं मृदु आवाजांत म्हणाली, "कांहीं कामानिमित्त ते बाहेरगांवीं गेले आहेत आणि आठवडाभर येण्याचा संभव नाहीं!"

“ कांहीं हरकत नाहीं ! ” बगाराम तिच्या सुंदर चेहऱ्याकडे पहात म्हणाला, “ तोंपर्यंत मी थांबतों इथं ! ”

★

## करारनामा ! ३

तिंबुनाना आणि बंडुनाना ह्यांची एकदां रस्त्यांत गांठ पडली. तिंबुनानाला नुकतीच नात झाल्यामुळं बंडुनाना त्यांचं अभिनंदन करून म्हणाले, “ आजोबा झालांत तुम्ही तिंबुनाना. तुमच्या जांवयाकडे मी जाणारच आहें. ”

“ नांव काढूं नका त्या बदमाशाचं. ” तिंबुनाना कडाडले.

“बदमाश ! अहो म्हणतां काय तुम्ही तिंबुनाना ! ” बंडुनाना आश्चर्यानें म्हणाले, “ तुमच्या मुलीबरोबर त्यानं प्रेमविवाह केला ना ? हुंड्याचा एक पैसासुद्धां घेतला नाहीं त्यानं. तुम्ही तर अगदीं आनंदानं वेडे झालां होतां हुंडा वांचला म्हणून ! ”

“ अहो, पण त्यानं आतां मला एकवीस हजार रुपयांना बनवलं की ! ”

“ एकवीस हजार ! म्हणतां काय ? ”

“ अहो, मला त्याचा संशय होताच. म्हणून तर मी त्याच्याशीं करारनामाही केला होता. ”

" कसला करारनामा बुवा ! "

" लग्नाआधींची मुलीची सारी जबाबदारी मुलीच्या बापावर. परंतु लग्नानंतरची सारी जबाबदारी नवऱ्यावर. म्हणून लग्नानंतर एक पैसाही मिळणार नाहीं असा करारनामा मी वकिलाच्या सहीनं करून घेतला होता."

" मग त्यानं एकवीस हजार कसले मागितले ? "

" हे पहा की!" असं म्हणून तिंबुनाना खिशांतून एक कागद काढून वाचूं लागले,

" बायकोच्या बाळंतपणाचा एकंदर
खर्च—रु. ६००

मुलीच्या (तुमच्या नातीच्या) पालन-
पोषणाचा दरमहा ६० रुपयेप्रमाणें २०
वर्षांचा खर्च म्हणून आगाऊ रक्कम रु. १४४००
मुलीच्या लग्नवेळीं हुंडा म्हणून आगाऊ
रक्कम रु. ५०००
मुलीच्या लग्नाच्या वेळीं खर्च म्हणून
आगाऊ रक्कम रु. १०००

एकूण रु. २१०००"

" बराच चलाख दिसतो की जांवई !" बंडुनाना आश्चर्यानं म्हणाले, " परंतु कराराप्रमाणं मूल

लग्नानंतर झाल्यामुळं तुम्हाला कांहींच द्यायला नको!"

"अहो, पण त्या करारानंच सारा घोटाळा केला की!" तिंबुनाना म्हणाले, "जांवयाचं म्हणणं, मूल जरी लग्नानंतर झालं असलं तरी तें आठच महिन्यांनीं झालं आहे. अर्थात् तें लग्नाआधींच होऊं घातलं होतं. तेव्हां ती लग्नाआधींची भानगड असल्यामुळं त्याची जबाबदारी मुलीच्या बापावर!"

★

## नवीन शोध! ४

प्रो. धोडगे यांची कसला तरी एक शोध लावायची महत्त्वाकांक्षा होती. परंतु कोणता शोध लावायचा ह्यावर विचार करण्यांतच दिवस जाऊं लागले. जुन्या शोधांवर फुकट वेळ घालवायची त्यांची इच्छा नव्हती. शोध लावायचा तर तो नवीनच! असे बरेच दिवस गेल्यावर त्यांनीं एक दिवस कामाला सुरुवात करण्याचं ठरवलं आणि आपल्या मदतनिसाला बोलावून ते म्हणाले, "मी आतांच संशोधनकार्यास सुरुवात करीत आहें. तरी तूं संशोधन-मंडळांत धांवत जा आणि शोध न लागलेल्या वस्तूंच्या विषयांची एक यादी घेऊन पळत ये!"

★

## अहो, मी कांहींच केलं नाहीं—! ५

प्रो. शहाणे आज अगदीं खुशींत होते. कारणही तसंच होतं. कालच त्यांची पत्नी बाळंत होऊन मुलगा झाला होता आणि आज त्यांच्या पत्नीचं मानसशास्त्रावरील नवीन पुस्तक प्रसिद्ध झालं होतं. प्रो. शहाणे तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर असल्यामुळं मुलगा झाल्यापेक्षां त्यांना बायकोच्या नवीन पुस्तकानंच आनंद झाला. पुस्तक प्रसिद्ध झालें हें अजून कुणालाच माहित नसल्यामुळं ते तें पुस्तक खाकोटींत मारून मोठ्या ऐटींत कॉलेजांत आले.

कॉलेजांत येतांच त्यांचे सहकारी त्यांच्या भोंवतीं जमून मुलगा झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करूं लागले. अभिनंदनाच्या भरांत सर्व मंडळी आपल्या बायकोच्या पुस्तकाबद्दल आपलं अभिनंदन करीत आहेत अशी कल्पना होऊन शहाणे म्हणाले, “अहो, माझं कसलं अभिनंदन करतां! खरं म्हणजे तिचंच अभिनंदन केलं पाहिजे. त्यांत माझा कांहींच संबंध नाहीं!”

त्यांच्या बोलण्यानं सर्व मंडळी हंसूं लागली. ते कां हंसतात हें न समजून शहाणे पुढं म्हणाले, “अगदीं खरं सांगतों मी तुम्हांला. मी जरासुद्धां हातभार लावला

नाहीं. तिला जें कांहीं करायचं होतं तें तिनं माझ्या एका मित्राच्या साहाय्यानं केलं !"

★

## अगदीं तस्सं ! ६

चिमीला जरी सतरावं वर्ष लागलं होतं तरी तिला पांच वर्षांच्या मुलीइतकीही अक्कल नव्हती. एक दिवस ठमाबाई पोळ्या लाटीत असतां चिमी घाईघाईनं आंत येत, जरा लाजत लाजत म्हणाली, "आई, काल रात्रीं आपण इंग्रजी सिनेमांत पाहिलं होतं तें माहित आहे तुला ?"

"काय तें ?" ठमाबाईनं विचारलं.

"अग, तो नायक नायिकेला घट्ट छातीशीं धरून तिचं चुंबन घेत होता तें ?" चिमी जरा मुरकत म्हणाली, "अग, अगदीं तस्सं मला त्या शेजारच्या बाळ्यानं केलं बघ !"

"हात् कार्टे !" ठमाबाई लाटणं उगारीत खेंकसल्या, "असं सांगायला तुला कांहीं लाजशरम ?"

"आणि तूं ग कशी रात्रीं सिनेमा सुटल्यावर हळुच बाबांना अगदीं तस्सं करायला सांगत होतीस ?"

★

## बापसे बेटा सवाई ! ७

चिकटोपंत नांवाप्रमाणंच चिकटे होते. तसेच ते पक्के व्यवहारी होते. पैशांचा व्यवहार म्हटला कीं मग ते नातेंसुद्धां विसरून जात. प्रत्यक्ष मुलाकडेही ते चोखपणानं वागत. एकदां आपल्या १२ वर्षं वयाच्या मुलाला जवळ बोलावून ते म्हणाले, " हें बघ, बाळ्या, आपल्या घरासमोर बाग बनवायची आहे. जमीन खणा-यला कामगार लेकाचे सहा रुपये मागतात. पण मी पांच रुपयांवर एक पैही द्यायला तयार नाहीं. तेव्हां.... ! "

परंतु त्यांना पुढं न बोलूं देतांच बाळ्या चटकन् म्हणाला, " मग मला द्या ते पांच रुपये. मी खणून देतों जमीन ! "

पांच रुपयांत काम झालेलें पाहून चिकटोपंतांना कमालीचा आनंद झाला. रुपयाची बचत केली ह्या आनंदांत ते कामाला म्हणून बाहेर गेले.

साधारण तीन तासांनीं ते घरीं आले तर बाळ्या-च्याच वयाचीं वीस मुलं जमीन खणीत होतीं आणि बाळ्या त्यांच्यावर देखरेख करीत होता. आश्चर्यानं त्या मुलांकडे पहात चिकटोपंत घरांत गेले.

थोड्या वेळानं बाळ्या पैसे मागायला आला.

जमीन खणून तयार झाली ह्याची खात्री करून चिकटोपंतांनीं पांच रुपये बाळ्याच्या हातावर ठेवले आणि विचारलं, "बाळ्या, ह्या मुलांना कसं रे तूं कामाला लावलंस?"

"त्यांत काय मोठं?" बाळ्या खांदे उडवीत म्हणाला, "मी एक खणण्याची चढाओढ लाविली. जमीन सारख्या वीस भागांत विभागली आणि जो कोण आपला भाग सर्वांत आधीं खणील त्याला एक रुपया बक्षिस ठेवला. त्यामुळं जराही जमीन न खणतां मला चार रुपयांचा फायदा झाला!"

बाळ्या जातांच चिकटोपंत फडाफड् स्वतःच्या थोबाडींत मारून घेऊं लागले!

★

## अरेबियन् नाईट! ८

एकदां एक अरब गाढवावर बसून मजेंत चालला होता आणि त्याच्या मागून त्याची सुंदर तरुण पत्नी पाठीवर गवताचा भारा घेऊन पायीं चालत होती. बराच वेळ चालल्यामुळं ती अरेबियन् सुंदरी बरीच दमली होती. तरीसुद्धां तो अरब कांहीं दयामाया न दाखवतां आरामांत चालला होता.

त्या बाजूनं येणाऱ्या एका अमेरिकन तरुणाला

तिची ती स्थिति पाहून दया आली आणि तिच्या नवऱ्याला त्याच्या निष्ठुरपणाबद्दल तो जाब विचारूं लागला. नवऱ्याला कांहींच उत्तर देतां येईना, तेव्हां ती पुढं होऊन त्या तरुणाला म्हणाली, "अमेरिकन स्त्रियांना रात्रीं दमूनभागून घरीं आलेलेच नवरे आवडतात काय!"

★

## तोच काय तो लफंगा! ९

बाबुलालचं एका मुलीवर प्रेम बसलं होतं. पोरगी दिसायला सुंदर आणि चलाख होती. तशीच ती बोलण्यांतही अगदीं फटाकडी होती. बाबुलालचं तिनं तनमनधन सर्व कांहीं हरण केलं होतं. तिच्याशिवाय त्याला कांहीं गोड लागत नव्हतं. रात्रीचं तिला घेऊन सिनेमाला जाण्यांत तर त्याला औरच मजा वाटायची. पण तो सटोडिया पडल्यामुळं जरा संशयी वृत्तीचा होता. तिच्याशीं लग्न करण्याआधीं ती कशा आचरणाची आहे, तिचं अगोदर कुणावर प्रेम होतं कीं काय, हें जाणण्यासाठीं त्यानं सी. आय्. डी. ऑफिसांत फोन करून तिच्यावर पाळत ठेवायला सांगितली.

आठ दिवसांनीं त्याला सी. आय्. डी. चा रिपोर्ट मिळाला. त्यांत लिहिलं होतं—

"मिस् प्रेमाच्या एकंदर हालचालीवरून ती सभ्य वृत्तीची मुलगी दिसते. तिच्याबरोबर फिरणारे तिचे बहुतेक सर्व मित्रही सज्जन आहेत. फक्त तिला रात्रीं सिनेमाला घेऊन जाणारा सटोडीयाच काय तो लफंगा दिसतो! तोच तिला दुराचरणाला प्रवृत्त करीत असावा असा आमचा संशय आहे!"

★

## बाकी विसरूं नका! १०

आपल्या हॉटेलांत बरींच अनैतिक कृत्यें होतात ह्याची दामुअण्णांना माहिती होती. परंतु त्या कृत्यांना ते आळा घालूं शकत नव्हते. त्या कृत्यांना कसा आळा घालावा ह्याचा विचार करतां करतां त्यांना एक युक्ति सुचली. त्याबरोबर त्यांनीं एका सुताराला बोलावून हॉटेलमधील सर्व खोल्यांतल्या आंतील कड्या काढून टाकल्या.

आठ दिवसांनीं हॉटेलांत एक तरुण आणि एक तरुणी जागा शोधण्यासाठीं आलीं. दामुअण्णांनीं लगेच त्यांचीं नांवं रजिस्टरांत नोंदवलीं आणि ते त्या दोघांना घेऊन खोलींत आले.

आधुनिक पद्धतीनं सजवलेली ती खोली पाहून तो तरुण अगदीं खूष झाला. पण दरवाजाकडे लक्ष

जातांच तो म्हणाला, " काय हो, मालक, दरवाजांना आंतून कड्या नाहींत त्या ? "

"त्याचं असं आहे," दामुअण्णा गंभीरपणें म्हणाले, " आंतून कड्या असल्या कीं एकांत मिळतो आणि एकांत मिळाला कीं हॉटेलमध्यें भयंकर पापं होतात ! "

" असं, असं ! " तो तरुण म्हणाला, " मग तुम्ही बाहेर जातांना तेवढी बाहेरची कडी लावून घ्यायला विसरूं नका हं ! "

★

## दारू आणि सौंदर्य ! ११

चंचला रंगानं सांवळी, जराशी लठ्ठ अशी एक सामान्य नटी होती. स्टुडिओंत तिच्याकडे फारसं कुणी लक्ष देत नसत. एकदां संध्याकाळीं सातच्या सुमारास ती डायरेक्टरला भेटायला म्हणून त्याच्या खोलींत गेली. तिला पहातांच डायरेक्टर अगदीं आनंदांत म्हणाले, " ये, ये ना आंत ! "

जरा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर डायरेक्टर लाडांत येऊन म्हणाले, " बाकी दारू घ्याल्यावर तूं फारच सुंदर दिसतेस ! "

"दारू प्याल्यावर?" चंचला अगदीं आईस्क्रिम् होऊन म्हणाली, "पण मी कधींच दारू पित नाहीं!"

"तें माहित आहे मला!" ते हंसत हंसत म्हणाले, "पण मी पितों ना!"

★

## तुम्ही कोण ? १२

वयाच्या मानानं बन्या जेवढा कुशाग्र बुद्धीचा होता तेवढाच तो संशयी वृत्तीचा होता. प्रत्येक बाबतींत त्याला संशय आल्याशिवाय रहात नसे.

एक दिवस बन्या शाळेंत जायची तयारी करीत होता तोंच दारांत एक फेरीवाला आला. त्यानं बन्याला विचारलं, "काय रे बाळ, घरांत तुझी आई आहे काय?"

बन्या त्याच्याकडे अगदीं खुनशी वृत्तीनं पहात म्हणाला, "काय हो, माझ्या आईबद्दल विचारणारे तुम्ही कोण? विचार काय आहे तुमचा?"

★

## तरी मी सांगत होतें... १३

सत्यभामाबाई अत्यंत चिक्कू वृत्तीच्या होत्या. कोणतीही वस्तु त्यांच्या हातून कधींच सुटत नसे. फाटकं,

ठिगळ लावायला न मिळणारं लुगडंसुद्धा मोलकरणीला द्यायचं त्यांच्या जिवावर येई.

एक दिवस त्या घरांत विणकाम करीत बसल्या असतां शेजारचा एक इसम येऊन गंभीर चेहरा करून म्हणाला, " फारच वाईट बातमी ! कशी सांगावी हेंच मला समजत नाहीं. "

" अहो, झालं काय ? " तिनं उत्सुकतेनं विचारलं.

" तुमच्या नवऱ्यानं विहिरींत उडी टाकून आत्म-हत्या केली ! "

त्याबरोबर एकदम उभ्या राहून त्या रागानं म्हणाल्या, " तरी मी त्यांना सांगत होतें कीं बाहेर जातांना हाताला नवीन घड्याळ बांधूं नका म्हणून ! फुकट नवीन घड्याळ गेलं की ! "

☆

## बायको आणि झोंप ! १४

नेहमीं खुषींत दिसणारा मनोहर आज कांहीं तितकासा खुषींत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतं कीं स्वारीला अख्खी रात्र झोंप मिळाली नसावी.

" काय, मनोहरराव, आज काय झालंय ? बरं वाटत नाहीं का ? " त्याच्या एका दोस्तानं विचारलं.

"सबंध रात्र झोंप नाहीं!" मनोहर त्रासून म्हणाला.

"असं, असं!" त्याचा दोस्त हंसत म्हणाला, "म्हणजे सबंध रात्र बायकोबरोबर भांडत होतां वाटतं?"

"तसं नाहीं!" मनोहर सांगूं लागला, "त्याचं असं झालं, रात्रीं एका मित्राकडे गेलों होतों. तिथं दारू पिण्यांत आणि जुगार खेळण्यांत सारी रात्र गेली. सकाळीं आठला भीत भीतच घरीं आलों. बायको झोंपेंतच होती. तेव्हां विचार केला आपणही कपडे काढून जरा झोंपावं, म्हणून कपडे काढूं लागलों. तोंच बायको जागी झाली आणि विचारूं लागली, "आज एवढ्या सकाळींच ऑफिसांत निघालांत वाटतं?" तिच्याशीं वाद घालण्याच्या भानगडींत न पडतां तसेच कपडे पुन्हां चढवले आणि थेट ऑफिसांत आलों!"

★

## साफ खोटं! १५

म्हाळसाबाई फारच कडक स्वभावाच्या तशाच भयंकर संशयी वृत्तीच्या होत्या. नवरा सिनेमा कंपनीचा मालक पडल्यामुळं त्याच्या प्रत्येक हाल-चालीवर त्यांची कडक नजर असे. एक दिवस त्यांचा

नवरा रात्रभर घरीं आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सातच्या सुमारास दबकत दबकत घरांत शिरणाऱ्या नवऱ्याला पहातांच त्या कडाडल्या, "कुठं गेलां होतांत झक मारायला?"

"अशी रागावूं नकोस, लाडके!" नवरा समजाणीच्या स्वरांत म्हणाला, "त्याचं असं झालं. रात्रीं आमच्या नवीन पिक्चरचा मुहूर्त झाला. मुहूर्त झाल्यावर मी घरीं यायला निघालों होतों. पण मुख्य नटी मला तिच्या घरीं घेऊन गेली. फार गळेपडू आहे बघ ती. कांहीं केल्या सोडीनाच. मग काय विचारतेस, दारू काय, हंसणं काय, गाणं काय, नाचणं काय........ मग, तिच्याच घरीं झोंपलों झालं!"

"साफ खोटं! मला बनवतां होय?" म्हाळसाबाई कडाडल्या, "मला माहित आहे कुठं शेण खायला गेलां होतांत ते. कंपनींतल्या चार रिकामटेकड्यांना जमवून पत्ते खेळत बसलां असणार!"

★

## मला माझा नवरा पाहिजे! १६

एकदां एक सिनेमानट आपल्या पत्नीला घेऊन पार्टीला गेला होता. पार्टीला बरीच बडी बडी मंडळी हजर असल्यामुळं दारू वांटण्याचं काम नटीवर सोंपवलं

होतं. अशाच एका नटीबरोबर तो नट जो गेला तो बराच वेळ झाला तरी परत येण्याचं चिन्ह दिसेना. तेव्हां त्याच्या पत्नीनं दारू वांटणाऱ्या दुसऱ्या एका मुलीला विचारलं, "काय ग, ती साधारण सांवळ्या रंगाची दारू वाटणारी पोरगी कुठं आहे ?"

"असेल बाहेर कुणाबरोबर तरी मजा मारीत!" ती मुलगी म्हणाली, "कां ? तुम्हाला दारू पाहिजे काय ?"

"लाज नाहीं वाटत विचारायला ?" नटाची पत्नी कडाडली, "मला माझा नवरा पाहिजे !"

★

## ब्रॅडमनची सेंच्युरी ! १७

रात्रीं दहाचा समय होता. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया ह्यांच्यांत इंग्लंडमध्यें चुरशीचा टेस्ट सामना चालू होता. सामन्याचं धांवतं वर्णन रेडिओंत चालू होतं. तें वर्णन मुंबईतला एक नवोदित क्रिकेटपटु आपल्या पत्नीसमवेत बसून ऐकत होता. ब्रॅडमन अगदीं बेफामपणं खेळत होता. ब्रॅडमनच्या शंभर धांवा पुऱ्या होतांच त्या क्रिकेटपटूची पत्नी म्हणाली, "पुरुषांना रात्रीचाच जोर चढतो म्हणतात तें खोटं नाही !"

तिच्या नवऱ्यानं कांहींसं गोंधळून विचारलं, "कशाबद्दल म्हणतेस तूं ?"

"हेंच पहाना!" ती सांगूं लागली, "मागं जेव्हां आपला हिंदी संघ ऑस्ट्रेलियाला गेला होता तेव्हां ब्रॅडमन अगदीं सकाळींच खेळायला यायचा. अगदीं सकाळच्या वेळीं कांहीं त्याला विशेष चांगलं खेळतां येत नव्हतं. पण आतां पहाना इंग्लंडमध्यें रात्रीचा कसा दणकावून खेळतो तो! तुम्हीसुद्धां, गडे, रात्रीचेच खेळायला सुरुवात करा!"

✗

## नांव द्या! १८

नेहमीं दारूबंदी कशी यशस्वी होईल ह्या विचारांत गुंग असणाऱ्या दारूबंदी अधिकाऱ्याला एक नवीन कल्पना सुचली. त्याचबरोबर त्यानं लगेच एक नवा हुकूम काढला–दारूच्या गुत्त्यांत दारू प्यायला येणाऱ्या प्रत्येक इसमानं आपलं संपूर्ण नांव गुत्त्याच्या रजिस्टरांत नोंदवलंच पाहिजे. जे नांव नोंदवणार नाहींत त्यांना दारू मिळणार नाहीं.

ह्या हुकुमानं दारूबंदी बरीच यशस्वी होईल अशी त्याची खात्री होती. कारण गुत्त्यांत जाणारा इसम

इस्त्रीसाठीं आपलं नांव नोंदवणार नाहीं. त्यामुळं सहाजिक दारू पिणारांची संख्या बरीच कमी होईल.

हुकूम जारी होऊन पंधरा दिवस झाल्यावर तो अधिकारी आपल्या हुकुमाची अंमलबजावणी कशी काय चालली आहे हें पहाण्यासाठीं म्हणून एका गुत्त्यांत गेला. गुत्त्यांत चिक्कार गर्दी होती. इतकेंच नव्हे तर कांहीं लोक जागा रिकामी होण्याची वाट पहात उभे होते. आपल्या हुकुमाचा कांहींच परिणाम झालेला नाहीं हें पाहून त्यानं गुत्त्याचं रजिस्टर मागवलं आणि पहिलंच पान उघडून पाहिलं—त्याबरोबर त्याच्या डोळ्यांपुढं अंधेरी आली—

पहिल्याच पानावर खुद्द त्याचंच नांव होतं!

★

## भविष्यच तसं आहे! १९

आपल्या प्रियतमेनं दुसऱ्या एका सधन इसमाबरोबर लग्न केल्यापासून वशाच्या रागाचा पारा भयंकर चढला होता आणि जेव्हां ती त्याला मुद्दाम भेटायला म्हणून आली तेव्हां तर तो अगदीं रागानं बेफाम झाला. त्याचा तो अवतार पाहून त्याची प्रियतमा घाबरून गेली. परंतु जरा धीर करून ती लाडिकपणं म्हणाली, "रागावलांत वाटतं माझ्यावर?"

"मग काय तुला प्रेमानं कवटाळूं वाटतं ?" त्यानं रागानं विचारलं, "माझा विश्वासघात केलास तूं!"

"मी मुळींच तुमचा विश्वासघात केला नाहीं!" ती म्हणाली, "उलट तुमच्यासाठींच तर मी दुसऱ्याशीं लग्न केलं!"

"माझ्यासाठीं?" वशा ओरडला, "काय भयंकर बाई आहेस तूं! म्हणे माझ्यासाठीं. मी काय मरणार होतों तुझ्याशीं लग्न केल्याबरोबर?"

"होयच मुळीं!" ती म्हणाली, "माझ्या जन्मपत्रिकेंत स्पष्टच लिहिलं आहे कीं, लग्नानंतर एका महिन्याच्या आंत नवरा मरणार म्हणून! म्हणूनच तर मी अगोदर दुसऱ्याशीं लग्न केलं!"

★

## फारच सज्जन! २०

मिस् चंचला एका प्रख्यात संपादकाची प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून नुकतीच नोकरीला राहिली होती.

आठ दिवस गेल्यावर एके दिवशीं तिची आणि तिच्या एका बालमैत्रिणीची अचानक रस्त्यांत गांठ पडली. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर तिच्या

मैत्रिणीनं विचारलं, "कसा काय आहे ग तो संपादक ?"

"फारच विद्वान् आणि सज्जन माणूस!" चंचला म्हणाली.

"खरंच ?"

"अग, तुला माहित नाहीं. आमच्या ऑफिसांत किती तरी मुली आहेत. पण ते त्यांच्याकडे पहात नाहींत कीं बोलतसुद्धां नाहींत."

"अस्सं!"

"दहा वाजतां ऑफिसांत येऊन कॅबिनमध्यें शिरले कीं ते बरोबर साडेपांचला बाहेर पडतात."

"सारा वेळ करतात तरी ते काय आंत ?"

"माझ्याशीं चर्चा करतात!"

"कसली चर्चा ?" तिनें आश्चर्यानं विचारलं.

"ते एक महान् ग्रंथ लिहिण्याच्या विचारांत आहेत." चंचला जराशी लाजत म्हणाली, "संतति-नियमनावर!"

★

## नवरा आणि प्रेम २१

बंडोपंतांना नेहमीं आपल्या पत्नीला खिजवण्याची संवय होती. अगदीं लहानसं जरी कारण मिळालं तरी ते तिच्या अडाणीपणावर भरपूर तोंडसुख घेत.

एकदां एक इंग्रजी पिक्चर पाहून आल्यावर ते म्हणाले, "ह्याला म्हणतात खरं प्रेम. ती बाई आपल्या नवऱ्यावर कसं उत्कृष्ट प्रेम करीत होती. नाहीं तर तूं! दहा वर्षांत एकदांसुद्धां......."

"अहो, पण तो कांहीं तिचा स्वतःचा नवरा नव्हता!" बंडोपंतांची पत्नी म्हणाली.

★

## बिनवारशी मूल २२

एकदां एक शिक्षक वर्गांत मुलांना धडा शिकवीत होते. धडा वाचतां वाचतां त्यांत 'बिनवारशी मूल' हा शब्द आला. त्याबरोबर बाळ्यानं विचारलं, "मास्तर, बिनवारशी मूल म्हणजे काय?"

"एवढा मोठा घोडा झालास आणि बिनवारशी मूल म्हणजे काय हें माहित नाहीं तुला?" शिक्षक कडाडले, "बिनवारशी मूल म्हणजे एकाद्या बिनलग्नाच्या बाईला झालेलं मूल!"

"पण मास्तर," दुसऱ्या एका फाजील मुलानं मुद्दाम विचारलं, "ब्रिनलग्नाच्या बाईला मूल होईल कसं?"

"होतं." शिक्षक त्या मुलाकडे रागानं पहात म्हणाले, "चुकून होतं कधीं तरी तसं." नंतर ते बाळ्याकडे वळून म्हणाले, "बरं मग बाळ्या, आतां सांग बघूं ब्रिनवारशी मूल म्हणजे काय?"

"चुकून झालेलं मूल!" बाळ्या चटकन् म्हणाला.

★

## थापाडे आणि कंपनी! २३

एकदां गप्पाष्टक मंडळांत थापांची चढाओढ लागली होती. जो कोण अस्सल थाप मारील त्याला ५० रुपयांचं बक्षिसही जाहीर केलं होतं. ह्या चढाओढींत बऱ्याच थापाड्यांनीं भाग घेतला होता. शिवाय दोन प्रख्यात थापाड्यांची पंच म्हणूनही नेमणूक झाली होती. थापांच्या कार्यक्रमास सुरुवात झाली आणि थापाडे एक एक मोजकी ठेवून देऊं लागले.

एक थापाड्या उभा राहून म्हणाला, "एकदां मला विरारहून चर्नीरोडला यायचं होतं म्हणून सकाळीं ८ वाजतां लोकलमध्यें बसलों. गाडी सुरू होतांच मला

जरा डुलकी आली. आणि डोळे उघडतों तर काय हो? रात्रीचे आठ वाजलेले!"

"हें तर कांहींच नाहीं!" दुसरा थापाड्या म्हणाला, "एकदां मी पुण्याला जायला म्हणून गाडींत बसलों. गाडी सुरू होतांच माझा डोळा लागला. आणि जागा झालों तर काय? आठ दिवस निघून गेले होते!"

अशा तऱ्हेनं जो तो लोणकढी थाप ठेवून देऊं लागला. साधारण अर्धे उमेदवार थापा देऊन बसल्यावर बाताराम थाप द्यायला उठला.

"एकदां काय झालं," बातारामानं बोलण्यास सुरुवात केली, "पुण्याच्या सदाशिव पेठेंतील एक सनातनी वृत्तीचा सभ्य आणि सज्जन इसम...."

त्याबरोबर त्याला पुढं बोलूं न देतांच पंच, उमेदवार सर्व प्रेक्षकगण ओरडले, "पुरे पुरे. पुढं बोलूंच नका. तुम्ही जिंकलांत!"

★

## मी आहें हं इथं—! २४

मोफतचंद, फुकटचंद आणि उदारचंद ह्यांची अगदीं जिवाभावाची मैत्री होती. पैकीं मोफतचंद आणि फुकटचंद अट्टल त्रिलंदर होते. बिचारा उदारचंद

नांवाप्रमाणंच अगदीं उदार आणि साधाभोळा होता. नेहमीं मोफतचंद आणि फुकटचंद त्याला फसवीत असत.

एकदां त्या तिघांनीं मिळून एक दारूची बाटली विकत आणली आणि ते फुकटचंदच्या घरीं प्यायला बसले. दारू तिघांत सारखी वांटून झाल्यावर मोफतचंद म्हणाला, "अरे, आपण चणे आणायला विसरलों. दारूबरोबर चणे हे पाहिजेतच!"

"चण्याशिवाय दारूला चव नाहीं!" फुकटचंद म्हणाला.

आणि दोघांनीं मिळून उदारचंदाला चणे आणायला जायला सांगितलं. परंतु त्यांचा डाव ओळखून उदारचंद म्हणाला,

"मी नाहीं जाणार! तुम्हीं दोघे नेहमीं मला फसवतां! मी बाहेर गेलों कीं, तुम्हीं माझा वांटा पिऊन टाकाल!"

"आमचा तसा मुळींच विचार नाहीं!" मोफतचंद म्हणाला, "आम्हीं तुला पूर्वी फसवलं असेल. पण दारुडे समोर दारू असतांना कधींच खोटं बोलत नसतात!"

उदारचंदला त्याचं म्हणणं पटून तो चणे आणायला म्हणून बाहेर पडला.

उदारचंदला जाऊन पाव तास झाला, अर्धा तास झाला, एक तास लोटला, दोन तास लोटले तरी तो येण्याचं चिन्ह दिसेना. मोफतचंद आणि फुकटचंद यांनीं आपला वांटा कधींच संपवून टाकला होता. उदारचंद येण्याचं जेव्हां चिन्ह दिसेना तेव्हां मोफतचंद म्हणाला, " उदारचंद आतां येत नाहीं असं दिसतं. चल, आपण त्याच्या वांट्याची दारू पिऊन टाकूं!"

"मीही त्याच विचारांत होतों!" फुकटचंद म्हणाला.

" चल तर मग उशीर नको!" असं म्हणून मोफतचंद उदारचंदचा ग्लास उचलणार तोंच दारामागून आवाज आला—

" मी आहें हं इथं उभा. तुम्ही माझी दारू प्याल तर मी चणे आणायला मुळींच जाणार नाहीं!"

★

## परोपकार ! २५

धनश्रीबाईची परोपकाराबद्दल फारच ख्याति होती. एकदां ती स्वतःच्या मोटारींतून जात होती. तिच्या मोटारीच्या पुढं एक मोटारट्रक जात होती. त्या ट्रकमध्यें बरींच बंडलं होतीं. एका वळणावर येतांच त्या

ट्रकमधलं एक बंडल रस्त्याच्या बाजूला पडलेलं तिनं पाहिलं. लगेच तिनं मोटार उभी करून तें बंडल उचलून आपल्या मोटारींत ठेवलं. तें संध्याकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या एका वर्तमानपत्राचं बंडल होतं. जरा पुढं गेल्यावर आणखी एक बंडल तिला रस्त्याच्या कडेला पडलेलं दिसलं. तेंही उचलून मोटारींत ठेवून तिनं मोटार पुढं नेली. पुढेंही आणखी बरींच बंडलं तिला मिळालीं. सारीं बंडलं गोळा करून ती त्या ट्रकच्या शोधार्थ जाऊं लागली. साधारण बरंच अंतर तोडल्यावर तो ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा असलेला तिला दिसला. ट्रकच्या जवळ जाऊन ती ड्रायव्हरला म्हणाली, " अरे, हीं तुझ्या ट्रकमधून चुकून खालीं पडलेलीं बंडलं मी गोळा करून आणलीं आहेत. "

" काय ? " ड्रायव्हर बसलेल्या जागेवरून उडी मारून म्हणाला, " अहो, तीं बंडलं चुकून पडलीं नव्हतीं. वर्तमानपत्रं विकणाऱ्या पोऱ्यांसाठीं मुद्दाम तीं टाकलीं होतीं ! "

★

## व्यवहारज्ञान आणि गणित ! २६

एकदां एक शिक्षक विद्यार्थ्यांना त्रैराशिकाचं महत्त्व पटवून देत होते. त्रैराशिकाची माहिती सांगतांना

मास्तर म्हणाले, " गणितशास्त्रामध्यें त्रैराशिकाला फारच महत्त्व आहे. त्रैराशिकाशिवाय साधं व्यवहारज्ञानही फुकट जातं. त्रैराशिक बरोबर असलं कीं, आपोआप व्यवहारज्ञानही खरं ठरतं. उदाहरणार्थ पहा–१ माणूस जर एक काम ६० दिवसांत करतो तर तेंच काम ६० माणसें एका दिवसांत करतील. हें साधं व्यवहारज्ञान आपल्याला त्रैराशिकामुळंच कळतं!"

" मास्तर, त्रैराशिक नेहमींच बरोबर असतं ना?" एका हुशार मुलानं विचारलं.

" होय!" मास्तर अभिमानानं म्हणाले.

" तर मग " मुलगा म्हणाला, " जर एका बोटीला मुंबई ते कलकत्ता हें अंतर तोडायला ६ दिवस लागतात तर तेंच अंतर ६ बोटी एका दिवसांत तोडतील; नाहीं?"

★

## आगगाडीचा वेग! २७

बाताडे आणि थापाडे ह्यांच्या आगगाडीच्या वेगावर गप्पा चालल्या होत्या. नेहमींच्या संवयीनुसार बाताडे म्हणाला, " अरे, माझा प्रत्यक्ष अनुभवच सांगतों मी. एकदा अगदीं गाडी सुटायच्या वेळीं मी

डब्यांत चढलों. तोंच गाडी हलली. तेव्हां घाईघाईनं चार आणे खिशांतून काढून हमालाला देण्यासाठीं म्हणून खिडकींतून हात बाहेर काढला. आणि काय सांगूं राजा तुला ? गाडीचा वेग इतका होता कीं, ते चार आणे हमालाच्या हातांत पडण्याच्या ऐवजीं प्लॅटफॉर्मच्या अगदीं शेवटच्या टोंकावर उभ्या असलेल्या एका कॉलेजतरुणीच्या हातांत पडले ! "

" हें तर कांहींच नाहीं ! " थापाडे शांतपणानं म्हणाला, " एकदां मी लांबच्या प्रवासाला चाललों होतों. गाडी सुटायच्या वेळीं बायकोचं शेवटचं चुंबन घेण्यासाठीं म्हणून मी माझं डोकं खिडकीच्या बाहेर काढलं आणि चुंबन घेऊं लागलों. चुंबन घेतांना साहजिकच माझे डोळे जरा कुठं बंद झाले. आणि डोळे उघडून पहातों तर काय सांगूं महाराजा तुला ? अरे, दुसऱ्या स्टेशनवर उभ्या असलेल्या दुसऱ्याच एका बाईचं चुंबन घेत होतों मी ! "

★

## रशियांतले चोर ! २८

रशियाचा प्रवास करून आलेला एक अमेरिकन इसम आपल्या दोस्तांना रशियांतल्या गमती सांगतांना

म्हणाला, " मॉस्कोंतील अमेरिकेच्या वकिलातीचे सारे दरवाजे दिवसरात्र सारखे उघडे असतात!"

" असं?" त्याच्या मित्रानं आश्चर्यानं विचारलं, " मॉस्कोंत चोर, दरवडेखोर, वगैरे नाहींत वाटतं?"

" अट्टल दरवडेखोर आहेत." तो इसम म्हणाला, " पण दरवडेखोरांना दरोडा घालतांना पकडलं असतां जेवढी शिक्षा होते त्याच्या दसपट शिक्षा कुणी अमेरिकन वकिलातींत शिरतांना दिसला कीं त्याला मिळते!"

*

## अगदीं फुकट २९

चिक्कटोपंत अगदीं कंजूष वृत्तीचे होते. एकदां ते चारसहा मित्रांसमवेत काश्मीरचं सृष्टिसौंदर्य पहायला म्हणून गेले होते. काश्मीरमधील सुंदर स्थळं पहात सारी मंडळी पर्वताच्या एका टोंकावर आली. सारी मंडळी बरीच दमली होती. त्यामुळं त्यांनीं सफरचंद विकत घेण्याचं ठरवलं. तिथं फळांचीं बरींच दुकानं होतीं. परंतु चिक्कटोपंत एक डझन सफरचंदांना आठ आण्यांवर एक पैसा द्यायला तयार होईनात. दोनचार दुकानं हिंडल्यावर मंडळी टोकावरच्या एका दुकानांत आली. त्याबरोबर एक बारा वर्षांचा मुलगा पुढं होऊन

अदबीनं म्हणाला, "या, या. बसा ना!" असं म्हणून त्यानं सर्वांना बसायला जागा करून दिली आणि आपली दुर्बीण त्यांना देत तो म्हणाला, "दुर्बिणींतून आजूबाजूचं सारं सृष्टिसौंदर्य तुम्हांला इथं बसून दिसेल." असं म्हणून त्या मुलानं कुठं कुठं काय काय आहे तें त्यांना दाखवलं आणि आपल्या सफरचंदांपैकीं एक डझनभर उत्तम सफरचंदं निवडून त्यांना खायला दिलीं.

सफरचंदं खाऊन खूप झाल्यावर चिकटोपंतांनीं त्या मुलाला विचारलं, "सफरचंदांचे किती पैसे द्याव-याचे तुला!"

"कांहीं नाहीं!" तो मुलगा चट्कन म्हणाला, "मी हीं फळं विकण्यासाठीं ठेवलीं नाहींत. सृष्टि-सौंदर्य पहाण्यासाठीं जीं माणसं येतात त्यांना मी हीं फळं फुकट देतों. त्यांना आजूबाजूचं सृष्टिसौंदर्य दाखविण्यांतच मला खरं समाधान मिळतं!" असं म्हणून तो पुन्हां आजूबाजूच्या सुंदर देखाव्यांचं वर्णन करूं लागला.

चिकटोपंत त्या मुलावर अगदीं मनापासून खूष झाले आणि त्यांनीं अगदीं उदार होऊन खिशांतून दोन रुपये काढून त्या मुलाला दिले. त्याच्या मित्रां-नींही त्यांचं अनुकरण केलं.

जातां जातां चिकटोपंतांनीं जरा उत्सुकतेनं विचारलं, "कायरे, इतर माणसं फळं विकत असतांना तुला तीं फुकट वांटणं कसं परवडतं?"

"त्याचं असं आहे." तो मुलगा हातांतले बारा रुपये हालवीत कांहींसा हंसत म्हणाला, "त्यांच्यापेक्षां मला जास्त पैसे मिळतात!"

★

## आम्हांला समजतं! ३०

बंडोपंतांना कोंबड्या पाळण्याचा फार नाद होता. निरनिराळ्या देशांतील कोंबड्या आणून त्यांची पैदास करण्याचं त्यांना वेडच लागलं होतं. जगांतल्या बऱ्याच देशांतल्या कोंबड्या त्यांच्याकडे होत्या आणि ह्या कोंबड्यांच्या धंद्यावरच त्यांचा चरितार्थ चालला होता.

एकदां एक प्रसिद्ध इसम त्यांच्याकडे कोंबड्या पहाण्यासाठीं म्हणून आला. बंडोपंत त्या वेळीं कुठं तरी बाहेर गेले होते. त्यामुळं त्यांच्या पत्नी म्हाळसाबाई पाहुण्यांना कोंबड्या दाखवण्यासाठीं शेतांत घेऊन गेल्या.

तारांच्या निरनिराळ्या कुंपणांत वेगवेगळ्या जातीच्या कोंबड्या ठेवल्या होत्या. त्या पहात पहात

पाहुणे एका कुंपणाजवळ आले. त्या कुंपणांत बऱ्याच टर्की कोंबड्या होत्या. त्या कोंबड्यांत एक इटालियन कोंबडा होता. त्या कोंबड्यांकडे पहात पाहुणे म्हणाले, "तुम्हांला जर अस्सल टर्की कोंबड्यांची पैदास करायची असेल तर ह्या इटालियन कोंबड्याला इथून हालवलं पाहिजे!"

त्याबरोबर म्हाळसाबाई चटकन म्हणाल्या, "काळोख पडायच्या आंत आम्हीं नेहमीं त्याला इथून हालवतोंच की!"

★

## मला काय माहित—? ३१

बगाराम अगदीं साधाभोळा, कसाबसा मॅट्रिकच्या वर्गापर्यंत गेलेला तरुण होता. परंतु त्याला बायको मिळाली ती मात्र अगदीं फक्कड, फॅशनेबल आणि कॉलेजचं पाणी चाखलेली. तिचं शिक्षणाचं ज्ञान, पुरोगामी वृत्ति, रोमान्सच्या बेफाम कल्पना पाहून बगाराम अगदीं गार होऊन गेला. त्याला तिच्याशीं बोलण्याचीसुद्धां धास्ती वाटूं लागली. हो, कांहीं बोलायचं आणि तिच्याकडून कॉलेजमध्यें असं होतं, तसं होतं, ह्यावर तासभर लेक्चर ऐकायचं, त्यापेक्षां न बोललेलंच बरं.

एकदां तीं दोघं एकत्र बसलीं असतां त्याची बायको लाडांत येऊन विचारूं लागली, " अगदीं खरं सांगायचं हं, माझ्यावर तुमचं प्रेम आहे का ? "

" आहेना ! " बगाराम म्हणाला.

" तुम्हांला कधीं माझं चुंबन घ्यावंसं वाटत नाहीं ? "

" तुला जेव्हां जेव्हां मी पहातों तेव्हां मला तसं वाटतं ! "

" मग लग्न झाल्यापासून तुम्हीं आपण होऊन माझं एकदांही चुंबन घेतलं नाहीं तें ? " तिनं कांहींसं रागानं विचारलं.

" तूं कॉलेजमध्यें कोणत्या पद्धतीनं चुंबन घेत होतीस हें मला काय माहित ! " बगाराम शांतपणानं म्हणाला.

★

## मी तरी कां घ्यावी ३२

चंचला खरोखरच चंचल स्वभावाची होती. कुणीही नवीन फॅशन केलेली दिसली की तीही लगेच अनुकरण करी. तिच्या ह्या हौसेपायीं बिचाऱ्या नवऱ्याच्या खिशाला मात्र भयंकर चाट बसे.

एकदां एका दुकानाच्या शोकेसमध्यें तिनें एक

अगदीं नवीन फॅशनची साडी पाहिली. त्याबरोबर घरीं येऊन ती नवऱ्याला म्हणाली, " मला कीनई पन्नास रुपये पाहिजेत ! "

" पन्नास रुपये ? तुला तुझा नवरा कुबेराचा बाप वाटतो की काय ? "

" इश्श ! " ती लाडांत येऊन म्हणाली, " मी की नाहीं आतांच एक नवीन फॅशनची साडी पाहिली आहे. मला घ्यायची आहे ती ! "

परंतु त्यांनीं पैसे द्यायचं साफ नाकारलं. पैसे नाकारतांच नेहमींचा रुसवा सुरू झाला. आठ दिवस झाले तरी रुसवा जाण्याचा संभव दिसेना. तेव्हां त्यांनीं मुकाट्यानं पन्नास रुपये तिच्या हातावर ठेवले. त्याबरोबर ती लगेच आनंदानं साडी खरेदी करायला बाहेर पडली. साधारण अर्ध्या तासानं तिला रिक्त हस्तें परत आलेली पाहून नवऱ्यानं विचारलं, " हें काय ? साडी कुठं आहे ? "

" अजून ती तशीच शोकेसमध्यें आहे. " चंचला हिरमुसली होऊन म्हणाली, " जर दुसरं कुणीच ती घेत नाहीं तर मी तरी कां घ्यावी ! "

★

## इंद्रधनुष्य ३३

रावबहादूर पर्वत्यांची पत्नी एक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध होत्या. महिला मंडळाच्या अध्यक्ष, कॉर्पोरेशनच्या सभासद, नीतिमंडळाच्या सभासद, राजकारणांत प्रामुख्यानं भाग घेणाऱ्या अशी त्यांची बरीच ख्याति होती. बऱ्याच संस्थांशीं त्यांचा संबंध असल्यामुळं त्यांना भेटायला बरीच पुरुष मंडळी घरीं यायची. ही सर्व मंडळी एका खोलींत बसली कीं मग त्यांच्या हंसण्या खिदळण्याला भलताच जोर येई. बिचारे पर्वते मात्र एकटेच दुसऱ्या खोलींत बसून त्यांचं हंसणं खिदळणं ऐकत. आंत काय चालतं हें पहाण्याची त्यांना भयंकर उत्सुकता होती. पण इतर मंडळी आंत असतांना त्यांना तिथं यायची पत्नीनं सक्त मनाई केली होती.

शेवटीं एक दिवस त्यांना एक कल्पना सुचली. त्याबरोबर त्यानीं बाजारांत जाऊन नवीन धर्तीचा एक रेडिओ विकत आणला. हा रेडिओ चालू ठेवला असतां बाजूच्या खोलींत काय चाललं आहे हें निरनिराळ्या प्रकाशावरून समजत असे. कुणी हस्तां-दोलन केलं की निळा प्रकाश दिसे. कुणी कुणाचं चुंबन घेतलं की लाल प्रकाश दिसे. कुणी कुणाला

मिठी मारली की हिरवा प्रकाश दिसे. अशा निरनिराळ्या रंगाच्या प्रकाशावरून बाजूच्या खोलींत काय चाललं आहे ह्याची कल्पना येई.

एक दिवस ते आपल्या खोलींत रेडिओ लावून आपल्या पत्नीला भेटायला येणाऱ्या इसमांची वाट-पहात बसले. परंतु बसल्या ठिकाणींच त्यांना डुलकी आली. आणि जेव्हां त्यांना जाग आली तेव्हां बाजूच्या खोलींत हसण्याखिदळण्याला भलताच ऊत आला होता. आणि रेडिओंत, निळ्या, लाल, हिरव्या, जांभळ्या, पिवळ्या वगैरे सर्व रंगांनीं युक्त असं सुंदर इंद्रधनूष्य दिसत होतं !

## मरेना का तो—! ३४

सुधाकरला भलतंच दारूचं व्यसन जडलं होतं. एकदां त्यानं एका बड्या सरकारी ऑफिसरला ताजमहालमध्यें पार्टी द्यायचं ठरवलं. पार्टीला फक्त ठराविकच निमंत्रित पाहुणे होते. दारूची खैरात होऊन जेवण वगैरे झाल्यावर पाहुणे जायला उठले. पाहुण्यांना मोटारी पर्यन्त पोंचवून सुधाकर परत हॉटेलांत आला. तो आपल्या जाग्यावर जाणार तोंच बार जवळ त्याला त्याचा मित्र तळीराम भेटला—

मग काय विचारतां ? पुन्हां दारूच्या बाटल्या फुटूं लागल्या. साधारण दोन तास पर्यन्त अखंड मदिरापान झाल्यावर त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. बोलतां बोलतां सुधाकर म्हणाला, " अरे तुला भेटायच्या अगोदर मी त्या बड्या सरकारी ऑफिसरबरोबर पीत होतो ! "

" खरंच ? " तळीरामानं आश्चर्यानं विचारलं. " कुणाची पार्टी होती ? "

" खरंच, कुणाची बरं पार्टी होती ! " सुधाकर डोकं खाजवीत विचार करूं लागला. बराच विचार करूनही जेव्हां आठवण होईना तेव्हां तो म्हणाला, " मरेना का तो पार्टी देणारा. आपल्याला काय प्यायला मिळालं की झालं ! "

★

## तुम्हीच नाहीं का ते ? ३५

चमत्कृति सिनेमा कंपनीनं एका नवोदीत लेखकाच्या कथानकावर चित्रपट काढण्याचं ठरवलं. साधारण वर्षभरानं कंपनीतर्फे त्या लेखकाला त्याच्या कथेवर आधारलेल्या चित्रपटाच्या ट्रायल शोचं आमंत्रण आलं.

मोठ्या उत्साहानं तो लेखक वेळेवर स्टुडीओंत गेला. मालकानं त्याचं स्वागत केल्यावर पिक्चरला

सुरवात झाली. जसजसा एक एक सीन पडद्यावरून सरकूं लागला तसतसा तो लेखक महाशय गोंधळांत पडूं लागला. त्याला मालकाचा कांहींतरी गैरसमज झाल्यासारखं वाटूं लागलं.

पिक्चर संपल्यावर मालकानं विचारलं, "काय लेखक महाशय, कसं काय उठलं आहे पिक्चर?"

"सुंदर!" लेखक-महाशय म्हणाला, "परंतु ह्या पिक्चरचा कथालेखक कोण?"

"म्हणजे?" मालक आश्चर्यानं म्हणाला, "आपणच नाहीं का? तुमच्या कथानकांत आम्ही थोडीशी सुधारणा केली इतकंच. पात्रांचीं नांवं बदललीं, नायक काढून टाकून खलनायक घातला. नायिका धोबीण होती ती कॉलेज स्टूडंट केली. खेड्यांतले सीन शहरांत आणि समुद्रकिनाऱ्यावरचे जंगलांत घेतले. तसा म्हणण्यासारखा फरक नाहीं केलेला तुमच्या कथानकांत."

*

## रिकामं आहे म्हणून! ३६

शरीरविज्ञानाचे शिक्षक विद्यार्थ्यांना 'रक्ताचं कार्य' हा धडा शिकवीत होते. धडा शिकवून झाल्यावर

उजळणी करतांना ते म्हणाले, "आतां असं पहा, मी पायांवर उभा राहिलों असलों तरी माझ्या अंगांतलं सारं रक्त पायांत येत नाहीं! येतं काय?"

"नाहीं!" विद्यार्थ्यांनीं एकमुखी उत्तर दिलं.

"पण" शिक्षक म्हणाले, "मी जर डोक्यावर उभा राहिलों तर रक्त माझ्या डोक्यांत येतं! असं का सांगा बघूं!"

सारे विद्यार्थी एकमेकांकडे टकामका पाहूं लागले. कुणीच उत्तर देईना. शेवटीं शिक्षकानीं एका विद्यार्थ्याला विचारलं, "गोट्या तूं सांग बघूं? रक्त माझ्या डोक्यांत कां येतं?"

गोट्या क्षणभर विचार करून म्हणाला, "तुमचं डोकं रिकामं आहे म्हणून!"

★

## हनीमून ! ३७

केरोपंताची बायको म्हणून कधीं टिकत नव्हती. लग्नानंतर चार पांच महिन्यांतच बायको मरायची, अथवा कुणाचा तरी हात धरून पळून जायची. अशा त्यांच्या पांच बायका खलास झाल्या. सहावी बायको काय ती टिकली.

एकदां पत्नी समवेत ते प्रवासास निघालेले पाहून त्यांच्या एका मित्रानं विचारलं, " काय केरोपंत कुठं निघालांत ? "

" हनीमूनला ! " केरोपंतांनीं उत्तर दिलं.

" हनीमूनला ? " मित्रानं आश्चर्यानं विचारलं, " म्हणतां काय केरोपंत तुम्हीं ? अहो लग्नाला सहा महिने झाले आणि आतां हनीमून ! "

"हो !" केरोपंत शांतपणानं म्हणाले, "हनीमून-साठीं पैसे खर्च करण्यापूर्वीं म्हटलं अगोदर बायको कितपतटिकते ती पहावं ! "

☆

## पहिल्यांदाच ! ३८

एकदां एका पाहुण्यानें ' हास्य मंडळाला ' भेट दिली मंडळाचे प्रमुख पाहुण्यांना सभासदांची ओळख करून देऊं लागले. इतक्यांत एक सभासद ओरडला, "नंबर अकरा." त्याबरोबर सारे खदखदां हंसूं लागले. हंसूं थांबतांच लगेच दुसरा एक इसम ओरडला, "नंबर वीस." त्याबरोबरही सारे हंसूं लागले. त्यांचं हंसूं थांबतं न थांबतं तोच तिसरा ओरडला. " नंबर नव्वद ! " त्याबरोबर तर हास्याचा प्रचंड स्फोट

होऊन सर्वांची हंसून हंसून मुरकुंडी वळूं लागली. ह्या प्रकारानं गोंधळांत पडलेल्या पाहुण्यानं प्रश्नार्थक मुद्रेनं प्रमुखाकडे पाहिलं.

" त्याचं असं आहे " प्रमुख म्हणाले, " हे सारे प्रख्यात हास्यकथा लेखक आहेत. जगांतल्या सर्व प्रख्यात हास्यकथा त्यांना माहित आहेत. ह्या सर्व कथांना त्यांनीं नंबर दिले आहेत. आणि वेळेची बचत करण्यासाठीं म्हणून ते कथे ऐवजीं फक्त नंबरच सांगतात. त्या बरोबर प्रत्येकाला आपण प्रत्यक्ष कथाच ऐकतों असं वाटून त्यांना हसूं येतं. "

" कल्पना बरी आहे ! " पाहुणे म्हणाले, " पण तो कोपऱ्यांतला इसम ९० नंबर ऐकून अजूनही कां हंसतो आहे ? "

" तो ती कथा आज प्रथमच ऐकत असावा ! " प्रमुख म्हणाले.

★

## रोमान्स आणि स्वयंपाक ! ३९

यशवंतरावांचं नुकतंच लग्न झालं होतं. घरांत ते आणि त्यांची पत्नी मिळून दोघंच असल्यामुळं त्यांच्या रोमान्सला भलताच ऊत आला होता. पत्नीची पाठ सोडायला ते तयार नव्हते.

७१८५



एक दिवस त्यांची पत्नी स्वयंपाकाच्या धांदलीत होती. एका हातांत "हजार पाकक्रिया" हें पुस्तक घेऊन ती एक नवीनच पक्वान्न बनवीत होती. स्वयंपाक बनवितांना तिची उडालेली धांदल पाहून यशवंतरावांच्या हृदयांतला रोमान्स अगदीं उफाळून वर आला आणि त्याबरोबर त्यांनीं एकदम पुढं होऊन तिला आपल्या बाहुपाशांत घेतलं आणि म्हटलं, "खरंच लाडके, किती सुंदर दिसतेस तूं ह्या स्थितींत! सिंपली ब्यूटिफूल!"

त्यांच्या ह्या झटापटींत तिच्या हातांतील 'हजार पाकक्रिया' गळून खालीं पडलं. त्याबरोबर ती रागानं म्हणाली, "बाई बाई बाई, काय लगटपणा हा! माझ्या हातांतलं पुस्तक खालीं पाडलंत की?"

"पुस्तक पडलं तर काय बिघडलं?"

"अहो पण मी काय बनवीत होतें हें आतां कसं समजायचं?"

★

## तसं असतं तर..! ४०

एकदां एक रसायनशास्त्राचे शिक्षक वर्गांत विद्यार्थ्यांना ॲसीड बद्दल माहिती सांगत होते. ॲसीडचे

गुणधर्म सांगून ते विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, "आतां मी हा रुपया ह्या ॲसीडमध्यें टाकतों. सांगा बघूं हा वितळेल का तसाच राहिल?"

"वितळणार नाहीं!" एक विद्यार्थी चटकन् म्हणाला.

"शाबास!" शिक्षक म्हणाले, "बरं आतां तूं उभा राहून वर्गाला सांग बघूं रुपया कां नाहीं वितळणार तें?"

"कारण" तो विद्यार्थी म्हणाला, "रुपया वितळला असता तर तुम्ही तो ॲसीडमध्यें टाकलाच नसता!"

★

## म्हणूनच तर... ४१

ठमाबाई स्वयंपाक घरांत कामाच्या गडबडींत होत्या. इतक्यांत दहा वर्षांचा बाळ्या रडत रडत आंत आला.

"कायरे झालं रडायला सकाळींच?" ठमाबाईनं बाळ्याला विचारलं.

"बाबा कीं नाहीं माडीवरून खालीं येतांना पडले!" बाळ्या रडत रडत सांगूं लागला.

"वेडा कुठचा" ठमाबाई पुत्राचं पितृप्रेम पाहून खुषीनं म्हणाल्या, "त्यासाठीं का रडायचं असतं?

आतां लहान नाहींस तूं रडायला. आतां तूं हंसलं पाहिजे ?"

"मीऽमीऽ" बाळ्या स्फुंदून स्फुंदून रडत म्हणाला, "मी हंसलों म्हणूनच तर बाबांनीं मारलं मला !"

★

## साभार परत !                                                    ४२

बाताराम‍ाला नोकरीची अत्यंत जरूरी होती. बराच प्रयत्न करूनही जेव्हां नोकरी मिळेना तेव्हां त्याला एक कल्पना सुचली. लगेच त्यानं एका प्रसिद्ध वर्तमानपत्रांत खालील जाहिरात पाठविली—

"**पाहिजे**—

एका तरुणाला वधु पाहिजे. वर सुस्वरूप असून विद्वान आणि हुशार आहे. वधूच्या रूपाचा, वयाचा अगर जातीचा प्रश्न नाहीं. तसंच वधु कुमारी अथवा विधवा असल्यासही चालेल. हुंड्याचा प्रश्न नाहीं ! अट फक्त एकच. वधूच्या बापानं वराला नोकरी अगर एखाद्या धंद्यांत भागीदारी दिली पाहिजे. फक्त अशाच लोकांनीं अर्ज करावेत. नोकरींत अगर भागीदारींत त्यांना पूर्ण समाधान दिलं जाईल. त्यांना जर काम पसंत पडलं नाहीं तर नोकरी अगर भागीदारी आणि मुलगी साभार परत केली जाईल !"

★

## ते सुद्धां भरले आहेत— ४३

गुंडोपंताचा गोट्या फारच हावरा होता. त्याच्या त्या हावरेपणामुळं त्याला बरोबर घेऊन कुठं मित्राच्या घरीं जायला सुद्धां गुंडोपंतांना लाज वाटत होती. एकदां त्यांना एका मित्राच्या घरीं चहापार्टीचं सह-कुटुंब आमंत्रण आलं.

पार्टीला निघण्याच्या आधीं गुंडोपंत म्हणाले, "हें बघ गोट्या, आपण दुसऱ्याच्या घरीं पार्टीला जातों आहोंत. तिथं दुसरे बरेच लोक येणार आहेत. तेव्हां तूं हावरेपणा दाखवूं नकोस. कुणीही कांहीं दिलं तरी नको म्हणून सांगत जा!"

गोट्याला नीतिमत्तेचे पाठ दिल्यावर ते सहकुटुंब पार्टीला गेले. पार्टीत खाण्याचे बरेच जिन्नस होते. पार्टी संपल्यावर पार्टीचे यजमान गोट्याला म्हणाले, "गोट्या, आणखी थोडीं फळं खा की!"

"नकोत मला! माझं पोट भरलं आहे!" गोट्या म्हणाला.

"मग थोडीं फळं खिशांत ठेऊन दे. घरीं खायला होतील!"

"नको!" गोट्या म्हणाला, "खिसे सुद्धां भरले आहेत!"

*

## पुण्यांतलीं हॉटेलं— ४४

एकदां एक इसम कांहीं कामासाठीं प्रथमच पुण्यांत आला होता. कामाला सुरवात करण्यापूर्वीं भोजन वगैरे उरकून घ्यावं, असा विचार करून त्यानं रस्त्यावरच्या एका इसमाला विचारलं, "इथं उत्तम जेवण मिळणारं एखादं हॉटेल आहे काय ?"

"किती तरी आहेत की !" तो इसम म्हणाला.

"मग मला एखादं दाखवतां काय !"

"माझी कांहींच हरकत नाहीं. पण खरं सांगायचं तर मला हें काम करणं आवडत नाहीं !"

"कां, काय हरकत आहे ?"

"तशी कांहीं हरकत नाहीं !" तो इसम म्हणाला, "पण तुम्हीं एकदां त्या हॉटेलमध्यें जेवल्यावर मला मात्र पुण्याचा अट्टल भामटा म्हणाल !"

★

## कांहींही करा पण...! ४५

खटपटे वकीलाकडे एकदां एक केस आली होती. केस समजून घेतल्यावर त्यांची खात्री झाली कीं आरोपीला फांशीची शिक्षा नक्की होणार. साक्षीपुरावा झाल्यावर तर त्यांची दृढ खात्रीच झाली कीं आरोपीचा

जीव वांचत नाहीं. परंतु त्यांनीं आरोपीच्या नातेवाईकांना आरोपीला फांशीच्या शिक्षेपासून वांचवण्याचं वचन दिलं होतं. आणि त्यापायीं भरपूर पैसाही घेतला होता. जेव्हां केस हातची जाते अशी त्यांची खात्री झाली तेव्हां ते ज्यूरींतल्या एका इसमाला बाजूला घेऊन म्हणाले, "तुम्हीं कसंही करून आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा मिळेल असं करा. मी तुम्हांला पांच हजार रुपये देईन !"

ठरल्याप्रमाणं आरोपीला आजन्म कारावासाची शिक्षा झाली. खटपटे वकिलांनी मोठ्या विजयी मुद्रेनं पांच हजार रुपये ज्यूरीला दिले. रुपये मोजून घेतल्यावर ज्यूरींतला तो इसम म्हणाला, "किती त्रास पडले म्हणून सांगूं तुम्हांला ह्या भानगडींत अहो, माझं ऐकायला कुणीच तयार नव्हते. शेवटीं बाकीच्यानाही पांचशें पांचशें रुपये द्यायचं कबूल केलं तेव्हां कुठें ते तयार झाले. अहो एकजात सर्वांचं मत होतं कीं आरोपी निर्दोषी आहे म्हणून !"

★

## फक्त तेवढंच घेतात ! ४६

सुधाकरची तब्येत बरीच खालावली होती. डॉक्टरकडे गेल्यावर डॉक्टरनीं विचारलं, "काय होतंय आपणाला ?"

"तसं कांहीं विशेष नाहीं." सुधाकर म्हणाला, "भूक लागत नाहीं, खाल्लेलं पचत नाहीं, जेवणावर वासनाच जात नाहीं आणि भयंकर अशक्तता वाटते !"

त्याची प्रकृति काळजीपूर्वक तपासल्यावर डॉक्टर म्हणाले, "मी सांगतों तसं करा. औषध देतों तें दिवसांतून चारदां घ्या. शिवाय रात्रीं जेवणापूर्वी रोज नेमानं थोडीशी ब्रँडी घेत जा आणि जेवणानंतर मी देतों त्या गोळ्या खा !"

आठ दिवसांनीं त्याचं औषध न्यायला आलेल्या त्याच्या पत्नीला–सिंधूला डॉक्टरनीं विचारलं, "आज गोळ्या घेतल्या नाहींत त्या ?"

"आतांपर्यंत नेलेल्या गोळ्या तशाच पडून आहेत !" सिंधु म्हणाली.

"म्हणजे ?" डॉक्टरनीं आश्चर्यानं विचारलं.

"तुम्ही सांगितल्याप्रमाणं ते फक्त जेवणापूर्वी भरपूर ब्रँडी तेवढी घेतात. त्यामुळं त्यांना जेवायची आणि गोळ्या घ्यायची शुद्धच राहात नाहीं !"

★

## इश्श ! कांहींतरीच बाई... ४७

बायकोला माहेरीं जाऊन आठ महिने झाले तरी ती येत नाहीं असं पाहून बगाराम स्वतः तिला

आणायला सासरीं गेला. बगारामनं सासऱ्याच्या घरांत पाय ठेवला तोंच दुसरे एक जांवईबापू त्याच वेळीं दत्त म्हणून हजर झाले.

घर अगदींच लहान असल्यामुळें रात्रीं सासरा दोन्ही जांवयांना घेऊन एका खोलींत झोंपला आणि सासू दोन्ही लेकींना घेऊन दुसऱ्या खोलींत झोंपली.

बगारामला प्रवासाचा शीण आल्यामुळं बिछान्यावर पडतांच त्याला झोंप लागली. रात्रीं एकदां पाणी पिण्यासाठीं म्हणून तो जागा झाला. उठून पहातो तों बाजूच्या बिछान्यावर दुसरे जांवईबापू नव्हते. गेला असेल बाहेर कुठं तरी असा विचार करून बगाराम पुन्हां झोंपीं गेला—

सकाळीं मागल्या दारीं बगाराम दांत घांशीत असतांना त्याची पत्नी जरा लाजत मुरडत त्याच्याजवळ येत म्हणाली, “ काय बाई तरी उतावळेपणा ! ”

बगारामनं कांहींसं गोंधळून विचारलं, “ काय झालं ? ”

“ इश्श ! उलट मलाच विचारतां वाटतं ! ” ती एक मुरका मारीत म्हणाली, “ रात्रीं काळोखांत येऊन माझं चुंबन घेतलं आणि........? ”

★

## पगडी वापरतों ना ! ४८

"मूनलाईट" क्लबमध्यें एकदां एक नावीन्यपूर्ण असा कार्यक्रम होता. क्लबचा असा नियम होता कीं, जो मेंबर आपल्या पत्नीला बरोबर घेऊन येईल त्यालाच आंत प्रवेश मिळेल. नियमानुसार बंडोपंत आपल्या पत्नीला बरोबर घेऊन क्लबमध्यें आले. कार्यक्रम सुरू झाला. जवळ जवळ दोनशें तीनशें जोडपीं हजर होतीं. कार्यक्रमाच्या शेवटीं क्लबच्या अध्यक्षांनीं एक बक्षिस जाहीर केलं—

"जो इसम ईश्वरसाक्ष अगदीं खरं सांगेल कीं आपल्या वैवाहिक आयुष्यांत आपण आपल्या पत्नी-व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही स्त्रीचं चुंबन घेतलं नाहीं त्याला एक सिल्कची हॅट् बक्षिस देण्यांत येईल !"

बक्षिस जाहीर करून अर्धा तास झाला तरी कुणीही उभा राहिना ! तेव्हां बंडोपंतांच्या पत्नी आपल्या पतीकडे कांहींशा संशयानं पहात म्हणाल्या, "तुम्हीं रहा ना उभे !"

"मी राहिलों असतों ग उभा;" बंडोपंत कांहींसे गोंधळत म्हणाले, "पण मला ती सिल्कची हॅट् काय करायची आहे ? मी पगडी वापरतों ना ?"

★

## एकाद्याचं नशीब ! ४९

" मर्चंट क्लब " मध्यें गप्पांना ऊत आला होता. सारे मेंबर शेट्ये होते. जो तो आपल्या नशिबानें आपल्याला कसा हात दिला ह्याच्या गोष्टी सांगत होता. बऱ्याचा जणांनीं आपले अनुभव सांगितल्यावर एकानं घेलाशेटला विचारलं, " काय घेलाशेट, तुमचा नशिबावर विश्वास आहे कीं नाहीं ? " " आहे तर ! " घेलाशेट म्हणाला. " मागं मी ज्या चार इमारती विकत घेतल्या त्या तर नशिबामुळंच ! "

" तें कसं काय बुवा ? "

" माझ्या मुलीच्या गाण्यामुळं !" घेलाशेट म्हणाला.

" गाण्यामुळं ? " सर्वांनीं आश्चर्यानं विचारलं.

" होय. " घेलाशेट म्हणाला, " माझी मुलगी गायला लागली म्हणून तर शेजारच्या इमारती मला अर्ध्या किंमतींत विकत घेतां आल्या ! "

*

## मग तुम्हीं विचारा ! ५०

एका पौराणिक नाटकावर नवराबायकोचा वाद चालला होता. बायकोचं म्हणणं तें पौराणिक नाटक कै. अण्णासाहेब किर्लोस्करांनीं लिहिलेलं आहे, तर

नवऱ्याचं म्हणणं तें नाटक कै. देवलांचं आहे. त्या नाटकाची छापील प्रत अस्तित्वांत नसल्यामुळं कुणीच एकमेकाचं म्हणणं मानायला तयार होईना. दोघंही आपलंच मत बरोबर आहे असं प्रतिपादन करूं लागलीं. शेवटीं बायको म्हणाली, " जेव्हां मी स्वर्गांत जाईन तेव्हां खुद्द अण्णासाहेब किर्लोस्करांनाच विचारीन कीं तें नाटक त्यांचंच आहे कीं नाहीं ! "

" पण समजा ते स्वर्गांत नसले तर ? " नवऱ्यानं जरा खोंचकपणें विचारलं.

" तर मग तुम्हीं विचारा त्यांना ! " बायको चटकन् म्हणाली.

★

## दुसरा कोण ? ५१

बरेच दिवस लष्करांत काम करून कंटाळा आल्यामुळं एका सैनिकाच्या मनांत आलं कीं कांहीं दिवस रजेवर जावं. त्याप्रमाणं तो रजा मागण्यासाठीं म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेला आणि म्हणाला, " मी रजेवर जाणार आहें ! "

" कां ? " अधिकाऱ्यानं विचारलं.

" माझी बायको आजारी आहे. हॉस्पिटलमधून तिचं पत्र आलंय ! "

"तुझी रजा नाकारण्याचं माझ्या जिवावर येतं." तो अधिकारी म्हणाला, " पण, नुकतंच तुझ्या पत्नीचं हॉस्पिटलमधून पत्र आलंय कीं तुझी तिथं कांहींच गरज नाहीं म्हणून !"

"ठीक आहे !" असं म्हणून त्या सैनिकानं त्याला सलाम ठोकला आणि तो जायला निघाला. परंतु दाराजवळ येतांच तो मागं वळून म्हणाला, "साहेब, आपल्या ह्या पलटणीमध्यें खोटं बोलणारे दोन इसम आहेत. पैकीं पहिला मी. कारण माझं मुळीं लग्नच झालं नाहीं !"

★

## उजेड आहे म्हणून! ५२

रात्रीचा दहाचा समय होता. एक दारुडा बरीच झोकल्यामुळें अगदीं तर्रर होऊन, एका गटाराजवळ म्युनिसिपालटीच्या दिव्याच्या उजेडांत कांहीं तरी शोधीत होता. बराच वेळपर्यंत तो सारखा आजूबाजूला रस्त्यावर चांचपत होता. नाक्यावर पहाऱ्यावर असलेला एक पोलीस त्याची ही मजा पहात होता. शेवटीं आणखी बराच वेळ गेल्यावर त्या पोलिसानं त्याच्या-जवळ जाऊन विचारलं, "कांहीं हरवलंय कीं काय?"

"होय." दारुडा म्हणाला.

"काय हरवलंय ?"

"पावली !" दारुडा आजूबाजूला शोधीत म्हणाला.

"कुठं हरवली ?"

"त्या तिकडे काळोखांत कुठं तरी पडली !"

"मग तिथं शोधायचं सोडून इकडे कशाला शोधतोस ?" पोलिसानं आश्चर्यानं विचारलं.

"इथं उजेड आहेना ?" दारुडा म्हणाला, "तिथं काळोखांत शोधून काय फायदा ?"

✱

## संगतीचा परिणाम ! ५२

वेड्यांच्या हॉस्पिटलांत नुकताच एक नवीन वेडा आला होता. भलत्याच वेळीं भलताच हट्ट धरून तो डॉक्टरला आणि नर्सला अगदीं भंडावून सोडी. एकाद्या वेळीं तो अगदींच पोरकट हट्ट धरून बसे, तर एकादे वेळीं भलताच अशक्य गोष्टीचा आग्रह धरून बसे.

एक दिवस दुपारचा बाराचा समय होता. डॉक्टर कसल्यातरी कामांत गुंतला होता. इतक्यांत नर्स येऊन म्हणाली, "डॉक्टर, त्या नव्या वेड्यानं आतां भलताच हट्ट धरलाय !"

"काय मागतोय तो ?" डॉक्टरनं विचारलं.

"जेवण दिलं, पण दूध प्यायला पाहिजे म्हणून रडत बसलाय !" नर्स म्हणाली.

"मग त्यांत मला सांगण्यासारखं काय आहे ?" डॉक्टर कामांत गुंतलेले असतांनाच म्हणाले, "दुधासाठीं रडत असेल तर पाज त्याला दूध !"

★

## तेवढं विसरूं नकोस ! ५४

प्रो. सारंगपाणीची एक विख्यात शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्धि होती. ते जेवढे विद्वान् होते तेवढेच भ्रमिष्टही होते. एक दिवस सकाळींच ते आपल्या प्रयोगशाळेंत कसल्यातरी शोधांत गुंतले होते. इतक्यांत त्यांची पत्नी हातांत वर्तमानपत्र घेऊन आंत येत म्हणाली, "हें पाहिलंत का वर्तमानपत्रांत काय छापून आलंय तें ?"

"काय छापून आलंय ?" त्यांनीं मान वर न करतांच विचारलं.

"तुमच्या मृत्यूची बातमी छापली आहे !"

"फारच वाईट झालं !" ते पूर्ववत् कामांत असतांनाच म्हणाले, "स्मशानयात्रा कधीं निघणार म्हणून छापलंय ?"

"संध्याकाळीं चारला !"

“चारला मला वेळ मिळेल असं वाटत नाहीं!” ते म्हणाले, “पण माझ्या वतीनं तूं त्याच्या पत्नीला सांत्वनपर संदेश पाठवायला बाकी विसरूं नको हं!”

★

## वेळापत्रक ! ५५

एकदां एका इसमाला कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं बाहेरगांवीं जायचं होतं म्हणून तो घाईघाईनं स्टेशनवर आला. पहातो तों गाडी एक तास लेट् म्हणून पाटी लागली होती. एका तासानं पुन्हां २ तास लेट्ची पाटी लागली. तो इसम मनांतल्या मनांत गाडीला शिव्या देत घड्याळाकडे पहात राहिला. दोन तास झाले तरी गाडी येण्याचं चिन्ह दिसेना. तेव्हां तो स्टेशनमास्तराकडे जाऊन म्हणाला, “ काय हो, मास्तर, गाडी येणार तरी कधीं ?”

सगळ्यांना उत्तरं देऊन त्रासलेला मास्तर कपाळाला आठ्या घालून म्हणाला, “ कुणाला माहित कधीं येणार ती ?”

त्याबरोबर तो इसम भडकून म्हणाला, “ ह्याचा अर्थ काय ? गाडी जर वेळच्या वेळीं येत नाहीं तर हें वेळापत्रक कशासाठीं ?”

“ गाडी किती तास उशीरां येते हें समजण्यासाठीं !” स्टेशनमास्तर शांतपणानं म्हणाला.

★

## जोरांत चालू आहे ! ५६

डॉ. शहाणेना क्रिकेटचा फारच नाद होता. ते स्वतःही क्रिकेट उत्तम खेळत असत. जलदगती गोलंदाज म्हणून त्यांची बरीच ख्यातीही होती. एकदां एका क्लबबरोबर त्यांची मॅच होती. त्यांनीं आपल्या एका मित्राला मॅच पहाण्याचं आमंत्रण दिलं होतं. परंतु कांहीं कारणामुळं त्या मित्राला वेळेवर मॅचला हजर होतां आलं नाहीं. जेव्हां तो मित्र मैदानावर आला तेव्हां मॅच चालू होती. त्यानं खेळ पहाणाऱ्या एका प्रेक्षकाला विचारलं, " डॉक्टर शहाण्यांनीं आज काय करामत केली ? "

" चांगलीच करामत करून दाखवली आहे त्यांनीं ! " तो प्रेक्षक म्हणाला, " आतांपर्यंत त्यांना चार विकेट् मिळाल्या आहेत आणि तीन पेशन्ट ! "

## विचित्र घटना ५७

धडपडे एका पार्टीला गेले होते. पार्टीला दारू भरपूर होती. साधारण दोनच्या सुमारास ते घरीं आले. दारावरची बेल वाजवतांच एका नर्सनं दरवाजा उघडला. तिच्याकडे ते आश्चर्यानं पहातच राहिले.

"तुम्हांला यायला फारच उशीर झाला. आतां दोन वाजले आहेत!" नर्स हातांतल्या घड्याळाकडे पहात म्हणाली, "तरी पण तुमच्यासाठीं आनंदाची बातमी आहे. तुमची पत्नी बाळंत झाली आणि तुम्हीं एकदम दोन मुलांचे बाप झालांत!"

"दोन मुलं?" घडपडे कांहींसे आश्चर्यानं म्हणाले, "मोठी विचित्र घटना म्हटली पाहिजे!"

नर्सला त्यांच्या बोलण्याचा अर्थ न समजून तिनं विचारलं, "कसली विचित्र घटना?'

"दोन वाजतां आलों आणि दोन मुलं झालीं!" घडपडे गंभीरपणं म्हणाले, "बरं झालं मी बारा वाजतां आलों नाहीं म्हणून!"

★

## अग, रात्र झाली—! ५८

प्रो. गोकुळ विसरभोळे नांवाप्रमाणंच विसरभोळे होते. कोणत्याही गोष्टीची आठवण म्हणून त्यांना रहात नसे. एखाद्या गोष्टीची आठवण ठेवायची म्हणजे ते दुसरी कसली तरी खुणेची वस्तु खिशांत ठेवीत. एकदां त्यांची पत्नी आजारी पडली. डॉक्टरनं औषध दिल्यावर त्यांना सांगितलं कीं पत्नीची तब्येत नाजूक आहे. तेव्हां तिला जागरण वगैरे करूं देऊं नका. नऊ

वाजतां झोंपलंच पाहिजे. आतां नेमकी त्यांना आठवण व्हायची म्हणजे मोठी भाग्याची गोष्ट ! तेव्हां दररोज रात्रीं आठवण होण्यासाठीं म्हणून त्यांनीं एक युक्ति शोधून काढली. आपल्या अभ्यासाच्या टेबलावर त्यांनीं आपल्या पत्नीच्या डोक्यांतला एक आकडा ठेवून दिला. रात्रीं जेवणखाण झाल्यावर जेव्हां ते वाचनासाठीं म्हणून टेबलाजवळ येत तेव्हां त्यांची नजर आकड्यावर जाई आणि मग ते पत्नीला झोंपण्याची सूचना देत.

एक दिवस नेहमींप्रमाणं ते कॉलेजांत जाऊन आपल्या वर्गांत लेक्चर देऊं लागले. लेक्चर देतांना सहज त्यांची नजर टेबलावर गेली. टेबलावर एक आकडा होता. एका वात्रट पोरानं एका पोरीच्या डोकींतला आंकडा काढून मुद्दाम टेबलावर ठेवून दिला होता आणि सारीं पोरं प्रोफेसर काय करतात ह्याची उत्सुकतेनं वाट पहात होतीं. आकड्याकडे लक्ष जातांच विसरभोळेंनीं तो उचलून हातांत घेतला आणि ते एकदम मोठ्यानं ओरडले—

" अग ए, ऐकलंस का ? रात्र झाली. झोंपायला ये पाहूं ! "

★

## मलाच माहीत नाहीं ! ५९

एका माणसावर तो वेडा आहे म्हणून खटला भरला होता. तो खरोखरच वेडा आहे कीं नाहीं हें सिद्ध करण्याचं काम एका अत्यंत हुशार वकिलावर सोंपवलं होतं. त्याप्रमाणं वकील त्याची परीक्षा घेऊं लागला—

"काँग्रेसचा पहिला अध्यक्ष कोण होता?" वकिलानं वेड्याला विचारलं.

"श्री. उमेशचंद्र बानर्जी!" वेड्यानं उत्तर दिलं.

"बरोबर आहे!" वकील म्हणाला, "बरं. दुसरा अध्यक्ष कोण होता?"

"श्री. दादाभाई नौरोजी!"

"अगदीं बरोबर. आता...."

परंतु वकील थांबलेला पाहून त्याच्या मित्रानं वकिलाला हळूच म्हटलं, "त्याची स्मृति तर उत्तम आहे. पुढं विचारा की. थांबलात का?"

"तिसरा अध्यक्ष कोण होता त्याची अगोदर मलाच खात्री नाहीं ना?" वकील म्हणाला.

★

## हळूच सांगा ! ६०

कोर्टांत एक महत्त्वाचा खटला चालू होता. फिर्यादीची साक्ष झाल्यावर आरोपीच्या वकिलानं आपल्या

साक्षीदाराला म्हटलं, "आतां नुकतंच फिर्यादी जें वाक्य बोलला तें जसेंच्या तसं तू उच्चार पाहूं !"

"माझी त्याला हरकत आहे!" साक्षीदार म्हणाला.

"कां ?" वकिलानं विजयी मुद्रेनं विचारलं.

"कारण तें वाक्य सभ्य इसमांच्यापुढं उच्चारण्यासारखं नाहीं !" साक्षीदार म्हणाला.

"तर मग," तो वकील म्हणाला, "हळूच जज्जसाहेबांच्या कानांत सांग !"

★

## जाते कसची ? ६१

चिमणरावाकडे एकदां एक दूरचा मित्र गप्पा झोडायला म्हणून आला. आल्यापासून त्यानं जी कांहीं बडबड सुरू केली कीं सांगतां सोय नाहीं ! साधारण चारपांच तास बडबड करून चांगला चहा आणि फराळ झोडून झाल्यावर स्वारी म्हणाली, "आतां मला गेलंच पाहिजे !"

"इतक्या लवकर ? पण खरोखरच जर तुम्हांला महत्त्वाचं काम असेल तर मी आग्रह नाहीं करीत थांबण्याचा !" चिमणराव पीडा कधीं एकदां जाते ह्याची वाट पहात म्हणाले.

"मला आतां गेलंच पाहिजे !" पाहुणे म्हणाले, "खरोखरच किती मजेंत वेळ गेला म्हणून सांगूं ! इथं

येण्यापूर्वी माझं डोकं भयंकर दुखत होतं. आतां डोकेदुखी पार पळाली !"

"अहो, पळाली नाहीं ती !" चिमणराव शांतपणानं म्हणाले, "माझ्या डोक्यांत शिरली; "

*

## तो सिनेमाला गेलाय ! ६२

संध्याकाळीं देवदर्शनाला जायचं हा तिंबुनानाचा नेहमींचा कार्यक्रम होता. देवदर्शन करून बाहेर पडल्यावर डाव्या हाताच्या कोपऱ्यावर उभा असलेल्या आंधळ्याला एक पैसा धर्म करून ते मग फिरायला जात.

एक दिवस नेहमींच्या संवयीनुसार त्यांनीं एक पैसा आंधळ्याच्या हातांत टाकला. परंतु तो पैसा त्याच्या हातांत न पडतां खालीं पडला आणि बराच लांब गेला. पण त्या आंधळ्यानं नेमकं त्या जागीं जाऊन तो पैसा उचलला. तिंबुनाना त्याच्याकडे आश्चर्यानं पहात म्हणाले, "मला वाटलं होतं तूं आंधळा आहेस म्हणून !"

"नेहमींचा आंधळा तो मी नव्हे !" तो म्हणाला.

"मग तो कुठं गेलाय आज ?" तिंबुनानांना विचारलं.

"तो आज सिनेमाला गेलाय म्हणून त्याची जागा मी घेतली आहे!"

★

## साथ देतोय तो! ६३

घारूअण्णा सकाळच्या वेळीं पेपर वाचीत बसले होते तोंच त्यांचे शेजारी मोरूनाना आले.

"या, मोरूनाना. आज सकाळींच कुठं तुमची स्वारी?" घारूअण्णानीं विचारलं.

"तुम्हांलाच भेटायचं होतं.!" मोरूनाना म्हणाले.

"काय काम आहे बुवा?"

"तुमचा कुत्रा आहे ना? त्याला विकून तरी टाका कुणाला, नाहीं तर मारून तरी टाका!"

"काय केलं बुवा आमच्या कुत्र्यानं?" घारूअण्णानीं कांहींसं घाबरून विचारलं.

"काय केलं? अहो, आठ दिवस झाले, आमची चिमी गायला शिकते. पण तुमचा कुत्रा तिला गायला देईल तर हराम! तिनं गायला सुरुवात केली कीं हा लागला सारखा भुंकायला!"

"त्याला बिचाऱ्याला काय माहीत ती गाते हें?" घारूअण्णा शांतपणानं म्हणाले, "त्याला वाटलं, आपला जातभाई ओरडतोय म्हणून साथ द्यावी!"

★

## सारं कांहीं माझंच ! ६४

एकदा एका म्यूझिक सर्कलमध्यें एका बाईचं गाणं चाललं होतं. ती एक भावगीत गात होती. तिचा तो मसाडा आवाज ऐकून एक इसम दुसऱ्याला म्हणाला, "हा काय आवाज आहे की तोफखाना ? तुम्हांला माहित आहे का कोण ती ?"

" हो. " दुसरा इसम म्हणाला, "माझी बायको आहे ती !"

त्याबरोबर पहिला इसम ओशाळल्यागत होऊन म्हणाला, "माफ करा हं मला. तुमची बायको हें मला माहित नव्हतं. बाकी त्यांचा तरी दोष काय ? भावगीतच तसं आहे त्याला त्या तरी काय करणार ? कोणत्या गाढवानं लिहिलंय तें माहित आहे का तुम्हांला ?"

' हो. " तो इसम शांतपणानं म्हणाला, "मीच लिहिलंय तें !"

★

## कधींच समजणार नाहीं— ६५

एकदा एका लेखकाची आगगाडींतून प्रवास करतांना दोघां स्त्रियांशीं गांठ पडली. दोघींच्या मध्यें

पडल्यामुळं त्याची अगदीं केविलवाणी स्थिति झाली. दोघींनीं तो लेखक आहे हें जाणून त्याच्यावर प्रश्नांचा मारा सुरू केला. कथानक कसं सुचतं, नायिका प्रत्यक्ष परिचयांतली असते कीं काय, वगैरे नाना प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडला. त्याच्या तावडींतून कशी सुटका करून घ्यावी या विचारांत तो असतांनाच गाडी एका बोगद्यांत शिरली आणि डब्यांत अंधार पसरला. त्याबरोबर त्यानं चटकन् आपला हात आपल्या तोंडाजवळ नेला आणि मोठ्यानं आवाज येईल अशा बेतानं हाताची पटापट चुंबनं घेतलीं. गाडी जेव्हां बोगद्यांतून बाहेर आली तेव्हां त्या स्त्रियांची बडबड थांबली होती आणि त्या दोघी एकमेकींकडे संशयित मुद्रेनं पहात होत्या. त्या दोघींकडे आळीपाळीनं पहात तो लेखक शांत पण गंभीरपणानं म्हणाला, " माझ्या आयुष्यांतील हीच एक घटना अशी आहे कीं, तुम्हांपैकीं कुणी माझं चुंबन घेतलं हें मला कधींच समजणार नाहीं ! "

★

## वाट पहातों ! ६६

एका इसमाला वर्तमानपत्रांत एक जाहिरात द्यायची होती म्हणून तो वर्तमानपत्राच्या कचेरींत गेला.

संपादकाला भेटून त्यानं म्हटलं, " मला तुमच्या पत्रांत एक जाहिरात द्यायची आहे! "

" ठीक आहे. द्या ना! " संपादक म्हणाले.

" पण त्याआधीं मला एक विचारायचं आहे. तुमच्या वर्तमानपत्रांत जाहिरात दिल्यानं फायदा होईल का? "

" त्याबद्दल तुम्हीं काळजी करूं नका. " संपादक म्हणाले, " परवांच एका इसमाची बायको हरवली म्हणून तो जाहिरात द्यायला म्हणून इथं आला, आणि काय सांगूं तुम्हांला आमच्या पत्राचा प्रभाव! अहो, त्यानं जाहिरात लिहायला सुरुवात केली आणि बायको सरळ चालत इथं आली! "

त्याबरोबर तो इसम कागद आणि पेन्सिल घेऊन लिहायला बसला. परंतु तास झाला, दोन तास झाले, चार तास झाले, तरी त्याला कागद आणि पेन्सिल घेऊन दाराकडे पहात बसलेला पाहून संपादकानं विचारलं, " अहो, करतांय काय तुम्ही? "

" बायकोची वाट पहातोंय! " तो इसम म्हणाला.

★

## अहो, तो मी नव्हे ! ६७

एकदां एक मूर्ख, एक न्हावी आणि एक टक्कलवाला असे तीन इसम पायीं प्रवास करीत होते. चालतां चालतां वाट चुकून ते एका जंगलांत आले. रात्र पडली तरी त्यांना मुक्काम सांपडेना. तेव्हां त्यांनीं जंगलांतच एका झाडाखालीं झोंपण्याचं ठरवलं. रात्रीची वेळ असल्यामुळं दोघांनीं पाळीपाळीनं झोंपावं आणि तिसऱ्यानं पहारा करीत बसावं असं त्यांनीं ठरवलं व त्याप्रमाणं टक्कलवाला आणि मूर्ख झोंपले आणि न्हावी पहारा करूं लागला.

एकटा बसून बसून न्हाव्याला कंटाळा आला. कांहीं तरी उद्योग हवा म्हणून त्यानं आपल्याकडच्या वस्तऱ्यानं मूर्खाच्या डोक्यावरचे सारे केस तासून टाकले. थोड्या वेळानं त्याचा पहारा संपल्यामुळं त्यानं मूर्खाला उठवलं. उठतां उठतां मूर्खानं सहज आपला हात डोक्यावर नेला आणि डोक्यावर केंस नाहीं हें पहातांच तो एकदम म्हणाला, " तूं मोठी चूक केलीस. माझ्याऐवजीं तूं टक्कलवाल्याला उठवलंस ! "

आणि तो पुन्हां झोंपला—

★

## प्यालों तरी शुद्ध आहे! ६८

रात्रीचा बाराचा समय होता. एक दारुडा चिक्कार दारू प्याल्यामुळं झोकांड्या खात खात घरीं चालला होता. रस्त्यावर आपल्यापुढं कोण आहे ह्याचीसुद्धां त्याला शुद्ध नव्हती. चालतां चालतां तो कोपऱ्यावर पेंगत बसलेल्या एका पोलिसाच्या अंगावर पडला. त्याबरोबर तो पोलीस एकदम खडबडून जागा झाला आणि त्या दारुड्याला पाहतांच एकदम गुर्मीत ओरडला, "मी कोण आहें माहित आहे का तुला?"

"मला कांहीं नक्की आठवत नाहीं." तो दारुड्या धडपड करीत उठून उभा रहात म्हणाला, "पण जर तूं कुठं रहातोस हें मला सांगितलंस तर बाकी मी तुला तुझ्या घरीं नेऊन पोंचवीन!"

*

## तुमचे हात मोठे आहेत म्हणून! ६९

एकदां एका इसमानं अनाथाश्रमाला भेट दिली. अनाथ मुलांसाठीं म्हणून त्यानं बरोबर बऱ्याच खारका आणल्या होत्या. खारका पुष्कळ असल्यामुळं त्यानं त्या मुलांपुढं ठेवल्या आणि मुलांना सांगितलं—

"प्रत्येकानं आपल्या दोन्ही हातांत मावतील तेवढ्या खारका फक्त एकदांच घ्याव्यात!"

एकामागून एक अशीं मुलं पुढं होऊं लागलीं आणि आपल्या हातांत मावतील तेवढ्या खारका घेऊन बाजूला होऊं लागलीं. जेव्हां बन्याची पाळी आली तेव्हां तो नुसता पुढं होऊन गप्प उभा राहिला.

"घे ना बाळ खारका!" तो इसम म्हणाला.

"नकोत मला!" बन्या म्हणाला.

"कां रे?" त्या इसमानं आश्चर्यानं विचारलं, "खारका आवडत नाहींत का तुला?"

"आवडतात." बन्या म्हणाला.

"तर मग उचल तुझ्या हातांत येतील तेवढ्या!"

परंतु बन्या कांहींच हालचाल करीना. तेव्हां त्या इसमानं स्वतः चांगल्या पसाभर खारका उचलल्या आणि बन्याच्या टोपींत टाकल्या—

जरा वेळ गेल्यावर त्या इसमानं कांहींशा उत्सुकतेनं बन्याला विचारलं, "काय रे बाळ, मी तुला स्वतःला खारका घ्यायला सांगितलं तेव्हां तूं कां घेतल्या नाहींस?"

"कारण," बन्या म्हणाला, "तुमचे हात माझ्या हातांपेक्षां मोठे आहेत!"

★

## विकतच नाहीं तर घेतो कोठून ? ७०

दोन गांजेबाज इसम गांजाच्या नशेमध्यें बोलत होते. एकजण म्हणाला, " मी आतां नुकतंच ठरवलं आहे कीं जगांतल्या साऱ्या हिऱ्यांच्या आणि माणकांच्या खाणी घ्यायच्या ! "

त्याच्या ह्या बोलण्यानं दुसरा इसम बराच गंभीर बनला आणि जरा वेळ विचार करून म्हणाला, " पण मला वाटतं मी कदाचित् त्या विकणारही नाहीं ! "

★

## पाहिजे तें मागा ! ७१

शंकरमामा म्हणजे प्रत्यक्ष रुद्राचे अवतार. घरांतील सारीं माणसं त्यांना वचकून असत. मुलांची तर त्यांच्यापुढं उभं रहाण्याची ताकदच नव्हती. ते बाहेरून येण्याची चाहूल लागली कीं मुलं थरथरां कांपूं लागत. मुलांच्या त्या स्थितीकडे पाहून शंकरमामांना स्वतःचा अभिमान वाटे.

एकदां दिवाळीच्या दिवशीं त्यांनीं आपल्या सर्व मुलांना जवळ बोलाविलं आणि म्हटलं, " आज दिवाळी आहे. प्रत्येकाला जें जें पाहिजे असेल तें मिळेल. कुणी घाबरायचं कारण नाहीं. अगदीं मनांत

आहे तें मागा. बरं विठ्या, प्रथम तूं सांग तुला काय पाहिजे तें!"

"पऽऽऽप!" विठ्या कांहींसा घाबरत बोलूं लागला.

"कांहीं घाबरूं नकोस. अगदीं स्पष्ट सांग. आज मागशील तें मिळेल. चल माग. काय पाहिजे तुला?"

"मला दुसरे बाबा पाहिजेत!" विठ्या चटकन् म्हणाला.

★

## जुनी आठवण! ७२

शांताराम नुकताच एका मुलांमुलींच्या शाळेंत मास्तर म्हणून लागला होता. मास्तरांच्या बरोबर बऱ्याच शिक्षिकाही शाळेंत होत्या. मास्तरिणींत एक साधारण प्रौढ वयाची, दिसायला सुंदर, अशी एक बाई होती. तिच्याबद्दल शाळेंतल्या सर्वांचं मत फार चांगलं होतं. ती कधीं कुणाशीं भांडायची नाहीं, कामाशिवाय जास्त बोलायची नाहीं कीं इतर मास्तरिणींसारखी अघळपघळ गप्पा मारायची नाहीं. आपलं काम बरं कीं आपण बरं! शाळेंतले सर्व शिक्षक आणि शिक्षिका तिच्याबद्दल नेहमीं चांगले उद्गार काढीत.

शांतारामची तिच्याशीं ओळख झाली आणि दिवसें-दिवस ओळख वाढत जाऊन त्याच्या हृदयांत तिच्या-

बद्दल प्रेमांकुरही वाढूं लागला. परंतु तिच्या वागण्या-वरून मात्र त्याला तिच्या मनाचा कांहींच पत्ता लागेना.

एक दिवस तिनं मुद्दाम त्याला आपल्या घरीं चहाला बोलावलं. चहा झाल्यावर तीं दोघं गप्पा मारीत बसलीं आणि जेव्हां तीं गप्पांच्या ऐन रंगांत आलीं तेव्हां त्यानं चटकन् तिला आपल्या बाहुपाशांत घेतलं आणि तिचीं पटापट चुंबनं घेतलीं. चुंबनं घेतांच ती रागावेल अशी त्याची समजूत होती; परंतु ती एकाएकीं हुंदके देऊन रडूं लागलेली पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्यानं धीर करून तिला विचारलं, "लाडके, कांहीं चुकलं का माझं?"

"नाहीं." ती हुंदके देत म्हणाली.

"मग रडायला काय झालं?"

"जुनी आठवण." ती रडें आवरीत म्हणाली, "शाळेचे जुने हेडमास्तर नेहमीं मला आपल्या बाहुपाशांत घेऊन अशींच चुंबनं घेत असत! त्यांची आठवण झाली मला!"

★

## आतां जमत नाहीं! ७३

वसंतरावाची बायको नेहमीं आजारी असायची. त्यामुळं त्यांनीं घरांत स्वयंपाक करण्यासाठीं, भांडीं आणि

कपडेलत्ते धुण्यासाठीं म्हणून बाई कामावर ठेवण्याचं ठरवलं. परंतु प्रयत्न करूनही त्यांना बाई सांपडेना. लढाईमुळं रामा गड्यांना भलताच भाव आला होता. शेवटीं महत्प्रयासानं त्यांना एक बाई मिळाली. बाई बरीच नखरेल आणि चवचाल वृत्तीची होती. परंतु नाइलाजानं तिला कामावर ठेवणं भागच होतं—

नोकरीवर ठेवल्यावर थोड्याच महिन्यांनीं ती बाई मालकिणीजवळ येऊन म्हणाली, " बाईसाहेब, या महिन्याच्या शेवटीं मला नोकरी सोडली पाहिजे ! "

" कां ? " मालकिणीनं कांहींसं आश्चर्यानं विचारलं, " इथं तर तुला कांहींच कमी नाहीं ! "

" तें खरं आहे, बाईसाहेब." ती म्हणाली, " परंतु थोड्याच महिन्यांपूर्वीं माझी एका सैनिकाबरोबर ओळख झाली. आमच्या वारंवार गांठीभेटी होऊं लागल्या आणि.......आणि आतां मी माता.......! "

" हें बघ ! " एक कल्पना येऊन मालकीण म्हणाली, " मी त्यांना विचारतें तोंपर्यंत तूं इथंच थांब ! "

पतिपत्नीमध्यें चर्चा झाली. लढाईचे दिवस. नोकरांची टंचाई. ह्यांचा त्यांनीं विचार केला. शिवाय त्यांचं लग्न होऊन बरींच वर्षे झालीं होतीं. त्यांना

मूलबाळ कांहीं नव्हतं आणि पुढं होण्याचा संभवही नव्हता. तेव्हां त्यांनीं त्या बाईचं मूल दत्तक घेण्याचं ठरवलं—

मालकीण बाहेर येऊन म्हणाली, " हें बघ, तुला आम्हीं सोडायचं नाहीं असं ठरवलं आहे. तुझं मूल आम्ही दत्तक घेऊं ! "

—आणि थोड्याच महिन्यांत वसंतराव एका दत्तक मुलाचे कायदेशीर बाप बनले.

आणखी एक वर्ष गेलं आणि ती बाई पुन्हां नोकरी सोडायला निघाली. ह्या वेळीं तिला एक खलाशी भेटला होता. दुसरं मूलही त्यांनीं दत्तक घेण्याचं ठरवलं.

असं करतां करतां वसंतराव चार दत्तक मुलांचे बाप बनले ! घर मुलांनीं अगदीं गजबजून गेलं. चारीही मुलं अगदीं धडपड्या वृत्तीचीं निघाल्यामुळं घर गाजूं लागलं.

अशा रीतीनं आणखी कांहीं दिवस गेल्यावर ती बाई पुन्हां एकदां नोकरी सोडण्यास निघाली.

" आतां ह्या खेपेला कोण भेटला तुला ? " मालकिणीनं कांहींसं त्रासानं विचारलं.

" ह्या खेपेला तशी कांहीं भानगड नाहीं, बाईसाहेब ! " ती म्हणाली, " परंतु आतां मला तुम्हीं

दोघं पतिपत्नी आणि ही चार मुलं एवढ्या मोठ्या कुटुंबाचं काम करणं जमत नाहीं. म्हणून मी नोकरी सोडून जातें आहें!"

*

## वकिलावर मात— ७४

घारूअण्णा म्हणजे एक विचित्र वल्ली होती. एकदां घाईघाईनं ते शेजारच्या वकिलाच्या घरांत शिरले आणि वकिलाला म्हणाले, "मला तुमचा सल्ला पाहिजे आहे. तुमची फी काय?"

"दहा रुपये." वकील म्हणाले, "पण सल्ला कशाच्या बाबतींत?"

"एकाद्या कुत्र्यानं एका इसमाचं जर कांहीं नुकसान केलं तर त्याची भरपाई कुत्र्याच्या मालकानं केली पाहिजे कीं नको?"

"जरूर केली पाहिजे!"

"तर मग काढा पांच रुपये!" घारूअण्णा पवित्र्यांत म्हणाले, "तुमच्या कुत्र्यानं नुकतीच माझी कोंबडी पळवली आहे!"

"पण माझी फी?" वकिलानं विचारलं.

" हे घ्या तुमचे दहा रुपये. घारूअण्णा खिशांतून दहाची नोट काढीत वकिलाला देत म्हणाले, " आणि द्या नुकसान भरपाईबद्दल पांच रुपये ! "

वकिलानं परत दिलेले पांच रुपये मोठ्या ऐटींत खिशांत घालून " जिंकलों कीं नाहीं मी ? " अशा मुद्रेनं वकिलाकडे पहात ते बाहेर पडले.

## नटीचं आत्मचरित्र ! ७५

एकदां सुप्रसिद्ध सिनेतारका जलबाला हिच्या मनांत आलं कीं, आपलं आत्मचरित्र लिहावं ! त्याबरोबर तिनं आपला प्रायव्हेट सेक्रेटरी चमनलालला बोलावून त्याला आपली योजना समजावून सांगितली आणि म्हटलं, "—मी सिनेमांत प्रवेश केल्यापासूनची तुम्हांला स्वतःलाच जेवढी माहिती आहे तेवढ्याची मला नोंद करून द्या ! "

आठ दिवसांनीं चमनलालनं टिपणं तिच्या हातांत दिलीं. टिपणं वाचतां वाचतां ती एकदम रागानं बेफाम होऊन म्हणाली, "अगदीं गाढव आहांत तुम्हीं ? कांहीं समजत नाहीं तुम्हांला ! "

"काय झालं ?" चमनलालनं कांहींसं घाबरत विचारलं.

"काय झालं ?" ती रागानं म्हणाली, "तुम्हीं फक्त चार घटस्फोटांची नोंद केली आहे आणि सहा लग्नं केल्याचं लिहिलं आहे !"

"त्याचं असं आहे. तुम्ही मला फक्त लग्न करतेवेळीं सांगितलं होतं. घटस्फोट घेतेवेळीं कुठं सांगितलं होतं ?"

"पण वर्तमानपत्रांत तर छापून आलं होतं ना ?"

"एका वर्तमानपत्रांत तुमचा आणि माझा संबंध असल्याचंही छापून आलं होतं. मग त्याचीही नोंद करूं का ?"

✱

## अमोल ग्रंथ ! ७६

एकदां दोघां मित्रांमध्यें वाङ्मयावर चर्चा चालली होती. सबंध वाङ्मयाचा आढावा घेतल्यावर एकजण म्हणाला, "परंतु ह्या सर्व ग्रंथांपैकीं लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य' ह्या ग्रंथाची सर कशालाच येणार नाहीं !"

"खरंच, जगाच्या वाङ्मयांत अमोल भर घालणारा ग्रंथ आहे तो !" दुसरा म्हणाला.

"तुम्ही कधीं वाचला आहे का तो ?"

"नाहीं! तुम्हीं वाचला आहे का?"
"नाहीं!"

✳

## तुमच्यासाठीं नाहीं— ७७

वसंतराव ऑफिसांत जायच्या तयारींत होते. तोंच त्यांच्या पत्नीनं त्यांना एक सुवासिक तेलाची बाटली आणून दिली. वसंतरावांनीं त्या बाटलीकडे आश्चर्यानं पहात विचारलं, "हें काय?"

"केंस न गळण्यावर रामबाण तेल!" त्यांची पत्नी म्हणाली.

"माझ्यासाठीं आणलंस कीं काय?" वसंतरावांनीं आनंदून विचारलं.

"तुमच्यासाठीं नाहीं!" त्यांची पत्नी म्हणाली, "तुमच्या प्रायव्हेट सेक्रेटरीसाठीं. तिच्या डोक्याचे केंस फारच गळतात आणि ते सारे तुमच्या कोटावर भलत्या ठिकाणीं पडतात म्हणून हें तेल आणलंय!"

✳

## त्याची नको काळजी. ७८

डॉ. धडके आपल्या पेशन्टला तपासीत होते. तपासणी संपल्यावर ते म्हणाले, "तसं घाबरण्याचं

कांहीं कारण नाहीं. चार दिवस औषध घ्या म्हणजे ठीक होईल!"

डॉक्टरनं दिलेलं औषध घेतल्यावर त्यानं डॉक्टरला म्हटलं, "डॉक्टर, तुम्हांला एक सांगायचं विसरलों!"

"काय तें?" डॉक्टरनं विचारलं.

"मला फारच नव्हेसपणा वाटतो. औषध घेतल्या-बरोबर अंगांत चेव आला पाहिजे, नाहीं तर मारामारी करण्याची खुमखुमी तरी आली पाहिजे, असं कांहीं तरी औषधांत घातलं आहे काय?"

"नाहीं." डॉक्टर शांतपणानं म्हणाले, "तें तुला माझ्या बिलांत सांपडेल!"

*

## लालभाईचं भाषण— ७९

रशियाचा प्रवास करून आलेला एक लालभाई एका हॉलमध्यें भरलेल्या सभेंत भाषण करीत होता. रशियांतील राज्यक्रान्ति इथपासून सुरुवात करून जगभर कम्यूनिझम कसं पसरत गेलं ह्यावर कित्येक तास त्याची बडबड चालली होती. प्रेक्षकगण त्याच्या ह्या बडबडीनं अगदीं कंटाळून गेला होता. परंतु भरल्या सभेंतून उठून जाणं सभ्यपणाला शोभून दिसणार नाहीं म्हणून कित्येक जण त्याची ती बडबड मुकाट्यानं

सहन करीत होते. शेवटीं एकदां त्या लालभाईला प्रेक्षकांची दया आली. भाषणाचा समारोप करतांना तो म्हणाला, "तुमचा बराच वेळ घेतल्याबद्दल मला माफ करा. माझ्याकडे घड्याळ नव्हतं म्हणून किती वेळ झाला हें मला समजलं नाहीं!"

"अहो, पण घड्याळ नसलं म्हणून काय झालं?" एक प्रेक्षक ओरडला, "तुमच्या पुढं टेबलावर तारखेचं कॅलेंडर तर आहे ना?"

★

## डॉक्टरी इलाज ८०

"काय, चिंतोपंत, तुमच्या मुलीचं म्हणे ऑपरेशन केलं आहे. काय झालं होतं तिला?" बंडोपंतांनीं विचारलं.

"तसं कांहीं विशेष नाहीं. तिला गाण्याचा शोक आहे. परंतु आवाज जरा जाडा आहे म्हणून ऑपरेशन केलंय गळ्याचं!" चिंतोपंत म्हणाले.

"मग सुधारणा झाली कीं काय आवाजांत?"

"झाली तर!" चिंतोपंत म्हणाले, "अहो, पूर्वीं ती गायला लागली कीं फक्त शेजारीच बोंब मारायचे त्रास होतो म्हणून आणि आतां तर विचारूच नका.

गल्लींतले सारेच रहिवाशी बोंबलायला लागले आहेत!"

★

## स्त्रियांचं पान! ८१

एका संपादकानं आपल्या मासिकांतल्या 'स्त्रियांचं पान' ह्या सदराचं संपादकत्व एका विदुषीवर सोपविण्याचं ठरवलं. त्याप्रमाणं त्यानं आपल्या मासिकांत 'सहसंपादिका पाहिजे' ह्या अर्थाची एक जाहिरात दिली. साधारण दोन दिवसांनीं त्याच्या कचेरींत बऱ्याच विद्वान् महिलांनीं एकच गर्दी करून सोडली. पहिल्या प्रथम एक फक्कडशी तरुणी आंत आली संपादकानं तिला बरेच प्रश्न विचारून शेवटीं विचारलं, "तुम्हीं अजूनपर्यंत कांहीं लिहिलंय का?"

" होय." ती तरुणी म्हणाली, " मागं एकदां मी माझी आत्मकथा लिहून दिल्लीच्या एका मासिकांत पाठवली होती."

" मग संपादकानं ती परत पाठवली कीं काय?" संपादकानं विचारलं.

"नाहीं." ती तरुणी कांहींशी लाजत मुरकत आणि कांहींशी हंसत म्हणाली, " स्वतः संपादक दिल्लीहून मुंबईला आले मला पहायला!"

★

## नेहमीं हिणवतेस काय मला ! ८२

प्रो. नारोपंत कांहींसे भ्रमिष्ट होते. बऱ्याच वेळां ते कांहीं ना कांहीं तरी विसरून येत असत आणि मग त्यांना पत्नीचं बोलणं ऐकावं लागे. एक दिवस ते सपत्नीक एका पार्टीला गेले होते. पार्टी संपतांच ते सपत्नीक घरीं जायला निघाले. बाहेर निघण्यापूर्वी त्यांनीं आठवणीनं आपला रेनकोट घेतला आणि पत्नीची छत्रीही स्वतःच घेतली. घरीं आल्यावर ते मोठ्या ऐटीनं पत्नीला म्हणाले, "मला हिणवतेस काय विसरभोळे म्हणून ! माझ्यापेक्षांही तूं विसरभोळी आहेस की !"

"काय झालं ?" तिनं आश्चर्यानं विचारलं.

"आज तूंच तुझी छत्री विसरली होतीस की !" ते रुबाबानं छत्री तिच्यापुढं नाचवीत म्हणाले, "माझ्या रेनकोटबरोबरच मी आणली आहे पहा !"

"अहो, पण आज घरांतून बाहेर निघतांना आम्ही बरोबर कांहींच घेतलं नव्हतं !" त्यांची पत्नी कपाळावर हात मारीत म्हणाली.

★

## अंगावर कपडे होते ना ! ८३

बन्या अवघा पांच वर्षांचा होता. एक दिवस दुपारीं त्याची आई त्याला बरोबर घेऊन आपल्या एका

मैत्रिणीच्या घरीं गेली बन्याच्याच वयाच्या ह्या मैत्रिणीच्या दोन मुली होत्या. त्यांच्यासंगें बन्या बराच खेळला.

संध्याकाळीं घरीं परत आल्यावर बन्याच्या मित्रानं त्याला विचारलं, "काय रे, कुठं गेला होतास तूं दुपारीं?"

"आईबरोबर दुसऱ्याच्या घरीं गेलों होतों." बन्या म्हणाला.

"तिथं मुलं होतीं का खेळायला?"

"हो दोन."

"मुलगे कीं मुली?"

ह्या प्रश्नानं बन्या कांहींसा गोंधळल्यासारखा झाला. परंतु साधारण गंभीर चेहरा करून तो म्हणाला, "तें मी कसं काय ओळखूं? त्यांच्या अंगावर कपडे होते ना!"

★

## आग आणि लोणी ८४

एकदां एक विद्वान् डॉक्टर संततिनियमनावर भाषण करीत होता. त्याचं भाषण ऐकण्यासाठीं म्हणून स्त्रिया आणि पुरुष यांनीं हॉल चिक्कार भरून गेला होता. संततिनियमनाची शास्त्रोक्त माहिती सांगून झाल्यावर तो डॉक्टर म्हणाला—

"........परंतु ह्या साधनांचा उपयोग होतोच असं नाहीं. आणि पुष्कळांना त्यांचा उपयोग करणंही शक्य नसतं, कारण त्यांच्याकडे तेवढा पैसा नसतो. पुष्कळ माणसं अशीं सांपडतील कीं संततिनियमनाचीं साधनं वापरीत असतांनाही त्यांना मुलं झालीं आहेत. जर खरोखरच मुलांची उत्पत्ति थांबवायची असेल तर ह्या कृत्रिम साधनांच्या भरीस न पडतां पुरुषानं आणि स्त्रीनं म्हणजेच नवराबायकोनं स्वतःच्या मनावर ताबा ठेवला पाहिजे. भावनावश होतां कामा नये."

"पण हें शक्य आहे का?" मध्येंच एका वृद्ध इसमानं विचारलं.

"कां शक्य नाहीं?" डॉक्टर म्हणाले, "अशक्य अशी गोष्टच ह्या जगांत नाही. आपल्या भावना आपण उद्दीपित होऊं देतां कामा नये!"

"पण डॉक्टर, मला असं सांगा," तो वृद्ध इसम पुन्हां म्हणाला, "जर एक लोण्याचा गोळा आगीच्या जवळ ठेवला तर तो विरघळल्याशिवाय राहील काय?"

★

## आतां काय सांगायचं! ८५

बगारामचं एका मुलीवर प्रेम बसलं होतं. त्याचा स्वभाव कांहींसा भिडस्त पडल्यामुळं त्याला आपलं प्रेम

तिच्यापुढं उघड करून सांगण्यास धीर होत नव्हता. परंतु एक दिवस त्यानं आपल्या मनाचा निर्धार केला आणि ती येतांच तो तिला म्हणाला, "रात्रीं काय गम्मत झाली माहित आहे काय तुला?"

"काय झालं?" तिनं विचारलं.

"मला एक मजेशीर स्वप्न पडलं!"

"कसलं स्वप्न?" तिनं उत्सुकतेनं विचारलं.

"स्वप्नांत मी आणि तूं दोघंच दूर दूर फिरायला गेलों होतों. तिथं आम्हां दोघांशिवाय कुणीच नव्हतं. आम्ही पुष्कळ पुष्कळ गप्पा मारल्या आणि शेवटीं मी ऽऽ मी ऽऽऽ तुला घट्ट बाहुपाशांत घेऊन तुझं चुंबन घेतलं!" बगाराम कसाबसा म्हणाला. त्याला वाटलं, आतां ती रागावणार.

पण ती निराशेचा एक निःश्वास सोडून म्हणाली, "जें जागेपणीं करायला पाहिजे तें तुम्ही झोंपेंत करून बसतां! आतां काय सांगायचं तुम्हांला!"

★

## संवयीचा परिणाम! ८६

एकदां तीन युरोपियन तरुण मजा करण्यासाठीं म्हणून जत्रेच्या ठिकाणीं गेले होते. तिथं त्यांना तीन पोरी भेटल्या. त्याही अशाच मजा करण्यासाठीं आल्या

होत्या. तिघां तरुणांपैकीं दोघे जरा हुशार होते. त्यांनीं त्या तिघींपैकीं रुबाबदार आणि फटाकड्या दिसणाऱ्या दोन पोरींना पसंत केलं आणि तिसऱ्याच्या वांट्याला राहिलेली प्रौढ आणि बावळट पोर आली. तिघींना घेऊन ते तीन दिशांना फांकले—

साधारण तास दीड तास त्या पोरींबरोबर मजा केल्यावर पुन्हां ते तिघे एकत्र आले आणि आपापले अनुभव सांगूं लागले.

पहिला सांगूं लागला, "काय कपाळ सांगूं? अरे, कुठं जरा रंगांत येऊन तिचं चुंबन घ्यायला गेलों तर ती सारखी 'तीन मिनिटं झालीं. बंद करा!' असं म्हणून मला थांबवायची!"

"होती तरी कोण ती?" दोघांनीं विचारलं.

"टेलिफोन ऑपरेटर! कांहीं मजा करतां आली नाहीं. बरं तूं काय मजा केलीस?" त्यानं दुसऱ्याला विचारलं.

"अगदीं तुझ्या सारखीच माझी स्थिति झाली." दुसरा सांगूं लागला, "जरा कुठं तिला बाहुपाशांत घेतों तोंच ती म्हणायची, "पांचच मिनिटं शिल्लक आहेत!"

"कोण होती ती?" दोघांनीं उत्सुकतेनं विचारलं.

"एका दारूच्या गुत्त्यांतली वेटर आहे ती!" दुसरा म्हणाला, "बरं पण आतां तूं काय केलंस तें सांग बघू."

त्याबरोबर तिसरा जरा खुशींत येऊन म्हणाला, "मग खरी मजा मीच केली म्हणायची!"

"तें कसं काय?"

"तुमच्यासारखा मी बोलण्याच्या वगैरे भानगडींत मुळींच पडलों नाहीं. सरळ तिला बाहुपाशांत घेऊन तिचं चुंबन घेतलं. आणि काय सांगूं तुम्हांला दोस्तानों! चुंबन घेतलं रे घेतलं कीं ती म्हणायची रिपीट प्लीज! आतां तुम्हीच सांगा केली कीं नाहीं मजा!"

ते दोन्ने आंबट चेहरा करीत म्हणाले, "पण ती बावळट पोर होती तरी कोण?"

"शाळेंतली मास्तरीण!"

★

## आजच्या पोरी! ८७

इंदिराकाकूंना हल्लीं आपल्या यमीची भारीच काळजी वाटूं लागली होती. पोरीचं पुढं कसं होईल ह्या चिंतेंत त्या नेहमीं असत. यमीला आतां त्रिसावं वर्ष लागलं होतं. दिसायला ती साधारणपैकींच होती.

तशांत अगदींच बावळट, साधीभोळी आणि लाजऱ्या स्वभावाची असल्यामुळं तिला कांहींच समजत नाहीं अशी इंदिराकाकूंची समजूत होऊन चुकली होती.

एक दिवस पोरीला उपदेशाचे धडे देण्याच्या उद्देशानं त्या म्हणाल्या, "यमे, पोरी, तुला आतां विसावं वर्ष लागलंय. तुला नीटनेटकं राहिलं पाहिजे. अग, आजच्या पोरींनीं जरा नटलंथटलं पाहिजे. व्यवस्थित साज-शृंगार केला पाहिजे. असं तुझ्यासारखं बावळटपणानं राहिलं वर कोणता तरुण पाहील तुझ्याकडे? तुला अगदींच कसं समजत नाहीं हें?"

"उगीच कांहीं तरी बोलतेस तूं आई!" यमी म्हणाली, "शेजारचा वसंत काय म्हणतो माहित आहे तुला?"

"काय म्हणतोय तो?" इंदिराकाकूंनीं जरा उत्सु-कतेनं विचारलं.

"म्हणतो, यमे लाडके, खरंच तूं किती सुंदर आहेस म्हणून सांगूं!"

"आणखी काय करतो तो?" इंदिराकाकूंनीं आश्चर्यानं विचारलं.

"मला घट्ट आपल्या बाहुपाशांत घेतो आणिऽऽ

आणि........इश्श ! मी नाहीं जा सांगत पुढचं !" यमी लाजत लाजत म्हणाली.

इंदिराकाकू डोळे फाडून यमीकडे पाहत राहिल्या !

★

## आतां हरकत नाहीं ना ? ८८

डॉ. शहाणे आपल्या रोग्यांना तपासण्यांत गढून गेले होते. इतक्यांत एक लठ्ठ मारवाडी आंत आला आणि डॉक्टरला म्हणाला, " डॉक्टर, ओळखलंत मला आपण ?"

त्याला पाहून डॉक्टर जरा विचारांत पडले. तेव्हां तो मारवाडी जरा हंसत म्हणाला, " विसरलांत वाटतं एवढ्यांत ? अहो, गेल्या वर्षीं मी संधिवातानं भयंकर आजारी होतों तेव्हां आपणच नाहीं का मला बरं केलं ?"

" असं, असं !" डॉक्टर ओळख पटून म्हणाले, " आतां ठीक आहेना ?"

" आतां साफ बरा झालोंय मी !" तो म्हणाला, " पण जरा एक विचारायचं होतं म्हणून आलों होतों."

" काय विचारायचं आहे ?"

"तुम्ही मला सांगितलं होतं कीं वर्षभर पाण्यांत जराही भिजूं नका म्हणून. आतां वर्ष होत आलं. तेव्हां आतां आंघोळ करायला हरकत नाहीं ना?"

★

## सांगा तर खरं! ८९

तळीराम जिवाला कंटाळला होता. कारणही तसंच होतं. किती दिवस तरी त्याला कुठंच दारू प्यायला मिळत नव्हती. जेव्हां दारूची तल्लफ सहन होईना तेव्हां त्यानं चौथ्या माळ्यावरून खालीं उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण दैवयोगानं त्याला फारशी इजा झाली नाहीं. फक्त धक्का बसल्या-मुळं तो बेशुद्ध होऊन पडला. लगेच तिथं जमलेल्या लोकांनीं त्याला जवळच्या दवाखान्यांत नेला. डॉक्टरनं ताबडतोब इलाज करून त्याला शुद्धीवर आणलं आणि त्याला हुशारी वाटावी म्हणून चांगले दोन चमचे ब्रँडी प्यायला दिली. ब्रँडी पहातांच तळीराम टुणकन् उडी मारून उठून बसला आणि डॉक्टरला म्हणाला, "डॉक्टर चौथ्या माळ्यावरून उडी मारल्या-बद्दल मला दोनच चमचे ब्रँडी मिळाली. आतां सांगा, कितव्या माळ्यावरून उडी मारली असतां मला चांगली ग्लासभर ब्रँडी प्यायला मिळेल?"

## पैसा बोलतो आहे! ९०

डॉ. घोरणेचं एका श्रीमंत बाईवर प्रेम बसलं आहे ही गोष्ट जगजाहीर झाली होती. तिच्याबरोबर फिरायला जातांना, सिनेमाला जातांना पुष्कळांनीं त्यांना पाहिलं होतं. एवढं असूनही ते तिच्याशीं लग्न कां करीत नाहींत ह्याचंच प्रत्येकाला आश्चर्य वाटत होतं.

एकदां त्यांच्या जिवलग मित्रानं त्यांना विचारलं, "काय रे, तुझं त्या बाईवर प्रेम आहे तर मग तूं तिच्याशीं लग्न कां नाहीं करीत?"

"तेवढा मूर्ख नाहीं मी!" डॉक्टर म्हणाले.

"कां? झालंय तरी काय?" मित्रानं जरा आग्रहानं विचारलं, "तिचं तुझ्यावर प्रेम नाहीं का?"

"माझ्यावर तिचं फार प्रेम आहे!" डॉक्टर शांतपणानं म्हणाले, "अरे बाबा, आमचं एकमेकांवर प्रेम आहे हें खरं; पण ती माझी महिन्याकाठीं दोनशें तीनशें रुपये देणारी पेशन्ट आहे हें विसरूं नकोस. तिच्याशीं लग्न करून एवढी रक्कम फुकट गमवूं म्हणतोस तूं!"

★

## सगळेच गेले आहेत

एकदा एका इसमाचा कुत्रा हरवला होता. बराच तपास करूनही जेव्हां कुत्रा सांपडेना तेव्हां त्यानं एका प्रसिद्ध वर्तमानपत्रांत जाहिरात दिली कीं, जो कुणी आपला कुत्रा शोधून आणून देईल त्याला मोठं बक्षिस देण्यांत येईल.

दुसऱ्या दिवशीं तो इसम कुत्र्याचा कांहीं तपास लागला कीं काय तें पहाण्यासाठीं म्हणून त्या प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या कचेरींत गेला. आपण कां आलों हें सांगून तो पट्टेवाल्याला म्हणाला, "मला संपादकांना भेटायचं आहे."

"संपादक नाहींत आंत." पट्टेवाला म्हणाला.

"मग सहसंपादक भेटले तरी चालेल."

"तेही नाहींत."

"व्यवस्थापक अगर बातमीदार तरी आहेत का ?"

"तेही नाहींत !"

"कुठं गेले आहेत सारे ?"

"बक्षिसाच्या आशेनं तुमचा कुत्रा शोधायला !"

★

## स्वर्ग आणि नरक ९२

बाबुलाल व्यापारी बच्चा होता. बोलण्यांत आणि वागण्यांत वकिलांनाही दाद देत नसे. एकदां दोन वकिलांशीं त्याची गांठ पडली.

"काय बाबुलाल, सध्यां तुमचा उद्योगधंदा काय?" एकानं विचारलं.

"वडिलांचाच धंदा पुढं चालू ठेवलाय मी!" बाबुलाल म्हणाला.

"म्हणजे? आपले वडील वारले वाटतं?" दुसऱ्यानं विचारलं.

"होय." बाबुलाल म्हणाला, "स्वर्गांत गेले ते."

"तर मग"—पहिला वकील त्याची मस्करी करण्याच्या उद्देशानं मुद्दाम म्हणाला, "ते पृथ्वीवर जसे लोकांना फसवीत होते तसे स्वर्गांतही फसवीत असतीलच!"

"होय." बाबुलाल त्याच्या बोलण्यांतली खोंच लक्षांत घेऊन म्हणाला, "तिथंही त्यांनीं एकाला फसवलं."

"मग त्यांच्यावर खटला भरला असेलच; नाहीं?"

"नाहीं हो!" बाबुलाल शांतपणानं म्हणाला,

"खटला भरायला एकही वकील स्वर्गात सांपडेना. चित्रगुप्ताकडे चौकशी केली तेव्हां कळलं कीं, अजूनपर्यंत एकही वकील स्वर्गाची पायरी चढला नाहीं!"

★

## मी कोण माहित आहे? ९३

एकदां बोटीवर नाविक दलाची सभा होती. बरेच पाहुणेही सभेला हजर होते. बोटीचे मुख्य अधिकारी सभेला उद्देशून भाषण करीत होते. त्यांच्याकडे पहात नाविक दलांतील एक तरुण इसम आपल्या बाजूच्या तरुणीला म्हणाला, "तो भाषण करतो तो कोण आहे हें माहित आहे का तुम्हांला? त्याच्यासारखा कंजूष आणि क्रूर इसम मी जगांत पाहिला नाहीं!"

"मी कोण माहित आहे का तुम्हांला?" त्या तरुणीनं शांतपणानं विचारलं, "मी त्यांची मुलगी आहें."

"असं होय? मला माहित नव्हतं." तो कांहींसा गोंधळून म्हणाला, "पण मी कोण आहें माहित आहे का तुम्हांला?"

"नाहीं." ती तरुणी उत्सुकतेनं म्हणाली.

"ईश्वराची कृपाच म्हणायची!" तो तरुण सुटकेचा एक निश्वास सोडीत म्हणाला.

★

## गाढव आहे म्हणून! ९४

मुंबई सरकारनं दारूबंदी जारी करण्याचं ठरविल्या-मुळें ठिकठिकाणीं दारूबंदी प्रचारार्थ सभा भरूं लागल्या होत्या. अशाच एका सभेंत एक कॉंग्रेस कार्यकर्ता दारूबंदीची आवश्यकता कां आहे हें सांगून झाल्यावर म्हणाला, "आतां समजा, मी इथं एका भांड्यांत पाणी ठेवलं आणि एका भांड्यांत दारू ठेवली आणि नंतर एका गाढवाला इथं आणलं तर तें गाढव काय पिणार सांगा बघूं?"

"पाणी!" एक इसम ओरडला.

"शाबास!" तो प्रचारक आपल्या भाषणाचा योग्य तो परिणाम होत आहे असं पाहून आनंदांत म्हणाला, "आतां सांगा बघूं गाढव दारू न पितां पाणीच कां पिणार तें?"

"कारण, तें गाढव आहे म्हणून! गाढवाला गुळाची चव काय?" तोच इसम पुन्हां ओरडला.

*

## ह्याला म्हणतात डोकं! ९५

दाजीनं दोन लग्नं केलेलीं पाहून आणि ती एकाच वेळीं, हें कळल्यापासून त्याच्या मित्रमंडळींत बरीच खळबळ माजली. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशीं त्याच्या

एका मित्रानं त्याला विचारलं, "कायरे दाजी, तूं एकदम दोन बायका कां केल्यास?"

"बाबा, त्यांत आमचं ट्रेड सीक्रेट आहे!" दाजी गंभीर चेहरा करून म्हणाला.

"सांग तर खरं काय तुझं सीक्रेट आहे तें."

"त्याचं असं आहे—" दाजी सांगूं लागला, "बऱ्याच वर्षांपासून मी आणि माझा एक मित्र एक लेखी करार पाळीत आलों आहोंत. करार असा. दोघांपैकीं कुणा एकानं एक पैसा जरी कमवला अगर कांहीं नवीन आणलं तरी त्याची दोघांत सारखी विभागणी झालीच पाहिजे. हा करार आम्ही आज कित्येक वर्षं पाळीत आलों आहोंत. मी लग्न करून एकच बायको आणली असती तर त्यानं भागीदारी मागितली असती. तेव्हां डोकं लढवलं आणि एकदम दोन बायका केल्या. मित्र आलाच भागीदारी मागायला तर दिली काढून एक!"

★

## पहिल्यांदा मी! ९६

एकदां कोर्टांत एका खटल्याचं काम चालू होतं. एका सुंदर तरुणीची उलट तपासणी घेतांना आरो-

पीच्या वकिलानं तिला विचारलं, "शनिवारीं रात्रीं तुम्हीं कुठं होतां ?"

ती तरुणी नाजुकसा मुरका मारीत म्हणाली, "मी एका मित्राबरोबर सिनेमाला गेलें होतें."

"आणि रविवारीं रात्रीं ?"

"दुसऱ्या एका मित्राबरोबर मोटारींतून फिरायला गेलें होतें." तीं कांहींशी मुरडत म्हणाली.

"आणि उद्यां रात्रीं कुठं जाणार ?"

त्याबरोबर फिर्यादीचे वकील एकदम उभे राहून म्हणाले, "जज्जसाहेब, हा प्रश्न विचारायला माझी हरकत आहे."

जज्जानं आश्चर्यानं खांदा उडवीत विचारलं, "कारण काय ?"

"कारण पहिल्यांदा मी तिला उद्यांची अपॉइन्टमेन्ट दिली आहे !"....फिर्यादीचे वकील म्हणाले.

*

## नुकतीच कुठं सुरुवात होते ! ९७

इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें मुलांच्या हितसंबंधावर आलेल्या बिलावर कडाक्याची चर्चा चालू होती. बिल अत्यंत महत्त्वाचं असल्यामुळं प्रत्येक ठरावावर सूचना,

उपसूचनांचा मारा चालला होता. अशाच एका सूचनेवर बोलतांना एक तरुण स्त्री म्हणाली, "मी पांच मुलांची आई असल्यामुळं माझ्या ह्या सूचनेला महत्त्व आहे. प्रत्यक्ष स्वतःच्या अनुभवावरूनच मी बोलतें आहें."

"पण मी सात मुलांचा बाप आहें!" दुसरा एक वयस्क सभासद म्हणाला, "तुमच्यापेक्षां मला जास्त मुलं असल्यामुळं माझा अनुभव जास्त महत्त्वाचा ठरतो. बोला, त्यावर तुमचं काय म्हणणं आहे?"

"पण मी कांहीं अजून मुलं होण्याचं थांबविलं नाहीं!" ती स्त्री सभासद चटकन् म्हणाली.

★

## त्या असतांना आणखी कशाला? ९८

चाळींतल्या रहिवाश्यांच्या त्रासानं वसंतराव अगदीं त्रासून गेले होते. वसंतराव ब्रह्मचारी होते. त्यांच्या अंगीं हौसही भरपूर होती. त्यामुळं त्यांच्या खोलींत रेडियो, ग्रामोफोन, आणि इतर बरींच करमणुकीचीं साधनं होतीं. त्यामुळं चाळींतले सारे पुरुष आणि स्त्रिया यांचा त्यांच्या खोलीवर सारखा अड्डा असे. वसंतरावांनीं त्यांना बंदी करण्यासाठीं नाना युक्त्या करून पाहिल्या; पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला

नाहीं. बिचारे त्यांच्या कटकटीमुळं अगदीं कंटाळून गेले. एक दिवस त्यांनीं मुद्दाम एका इसमाला विचारलं, "का हो बंडोपंत, तुम्हांला जर रेडिओचा एवढा नाद आहे तर मग तुम्हीं एक रेडिओ विकत कां नाहीं घेत?"

"अहो, रेडिओचा आणि फुकट खर्च कशाला?" बंडोपंत म्हणाले, "तुमचा रेडिओ आहे, गोपाळ-रावांकडे रेडिओ आहे, शिवाय समोरच्या चाळींतही रेडिओ आहेतच. कुणीही रेडिओ चालू केला तरी आम्हांला ऐकूं येतोच. आणि त्यांतल्या त्यांत तुमचा हक्काचा रेडियो आहेच की!"

वसंतरावांनीं आणखी एकदोघांना विचारून पाहिलं आणि त्यांच्याकडून बंडोपंतांसारखेंच त्यांना उत्तर मिळालं. त्या सर्वांच्या फुकट्या वृत्तीचा वसंत-रावांना तिटकारा वाटूं लागला.

एक दिवस सारी पुरुष मंडळी त्यांच्या खोलीवर जमून गप्पा झोडीत होती. बोलतां बोलतां सहज एकानं विचारलं, "काय हो वसंतराव, आणखी किती दिवस ब्रह्मचारी रहाणार आपण! लग्न करून टाका की आतां."

"लग्नाची काय जरूरी आहे?" वसंतराव गंभीर-पणानं म्हणाले, "चाळींतल्या बहुतेकांचीं लग्नं झालेलींच आहेत. सर्वांच्या बायका आहेतच की! त्या

असतांना मी मुद्दाम लग्न करून बायको आणखी कशाला आणूं ?"

दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या खोलींत शांतता नांदूं लागली !

★

## —पण खोटं बोलत नाहीं ९९

बातारामाला आपल्या बाळ्याचा फारच अभिमान वाटत होता. त्याच्यासारखा गुणी बाळ शोधून सांपडणार नाहीं अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. जेव्हां संधी मिळेल तेव्हां तो दुसऱ्यापुढं आपल्या बाळ्याची तोंडभर स्तुति करी.

एकदां त्याच्याकडे एक पाहुणा आला होता. त्याच्याजवळ तो बाळ्याचं गुणवर्णन कथन करीत होता. तोंच बाळ्या हातांत एक घड्याळ घेऊन आंत आला. त्याला पहातांच बातारामानं विचारलं, "काय रे बाळ्या, हें घड्याळ कुणाचं ?"

"मी शेजारच्या मध्याच्या घरीं खेळायला गेलों होतों ना ?" बाळ्या सांगूं लागला, "खेळतां खेळतां हळूच त्याच्या वडिलांच्या खिशांतून पळवलं मी हें !"

"पाहिलंत किती गुणी बाळ आहे माझं !" बाताराम पाहुण्याकडे वळून म्हणाला, "चोरी करील पण खोटं बोलणार नाहीं !"

★

## गाढव कोण ? १००

शाळेच्या पटांगणावर मास्तर मुलांना कवाईत शिकवीत होते. सर्व मुलांना एका सरळ रांकेंत उभे करून ते म्हणाले, "आतां मी सांगतों त्याप्रमाणं करायचं. मी एक म्हणतांच प्रत्येकानं आपला उजवा पाय आपल्या उजव्या हाताच्या बाजूनं सरळ वर उभारायचा. समजलं ना ? आतां करा सुरुवात. एक !"

—त्याबरोबर सर्व मुलांनीं सांगितल्याप्रमाणं केलं. परंतु एका मुलानं चुकून उजव्या पायाऐवजीं डावा पाय उचलला.

—सर्वांचे पाय समांतर रेषेंत आहेत कीं नाहीं हें पहात असतांना शिक्षकाच्या नजरेंत चटकन् त्या मुलाचा डावा पाय भरला. त्याबरोबर ते ओरडले, "दोन्ही पाय वर उचलणारा कोण तो गाढव !"

★

## तो म्हणतो तेंच कर ! १०१

एकदां धनश्रीबाई बरोबर बराच ऐवज घेऊन प्रवास करीत असतां दरोडेखोरांनीं रात्रीची गाडी अडवली आणि ते लुटालूट करूं लागले. लुटालूट करीत दोन दरोडेखोर तिच्या डब्यापाशीं आले. त्यांपैकीं एक

दरोडेखोर आपल्या साथीदाराला म्हणाला, "आम्हांला कुणाला इजा करायची नाहीं. पुरुषांनाच तेवढं लुटूं आणि स्त्रियांचीं फक्त चुंबनंच घेऊन त्यांना सोडून देऊं!"

"आम्हांला फक्त पैशाशीं कर्तव्य आहे!" दुसरा दरोडेखोर म्हणाला, "स्त्रियांचीं चुंबनं घेऊन त्यांच्या भावना का दुखवा? त्यापेक्षां त्यांच्याजवळचा पैसा-अडका घेऊं.

परंतु त्याला पुढं बोलूं न देतांच धनश्रीबाई एकदम डब्याचा दरवाजा उघडीत म्हणाली, "तुला कुणी सांगितलंय मध्यें बोलायला? तो म्हणतो त्याप्रमाणं कर तूं!"

★

## तुमचा सहवास लागायचा! १०२

एकदां एका गांवांत लष्करी तळ पडला होता. सकाळच्या प्रहरीं लष्करी कवाईत वगैरे करून चार-पांच सैनिक रस्त्याच्या बाजूला सहज गप्पा मारीत बसले होते. इतक्यांत त्या बाजूनं एक बारातेरा वर्षांचा एक खेडवळ पोरगा एका गाढवाला दोरीनं घट्ट धरून येतांना त्यांना दिसला. त्याला पाहून एका

सैनिकाच्या मनांत आलं कीं, पोराची जरा थट्टा करावी. त्याबरोबर तो त्या पोराला म्हणाला, "काय रे तुझ्या या भावाला तूं असा घट्ट पकडून कां नेतोस?"

त्या मुलानं क्षणभर त्या सैनिकाकडे पाहिलं आणि तो चटकन् म्हणाला, "काय करणार, शिपाईदादा, बोलूनचालून गाढवच पडलं तें. मोकळं सोडलं तर तुमच्यासारखं लष्करांत सामील होईल ना तें!"

*

## यंत्राचा उपयोग! १०३

नुकताच तुरुंगांत आलेला कैदी जेलरला म्हणाला, "किती जुन्या धर्तीचा तुरुंग आहे हा! जगांत किती तरी नवीन शोध लागले आहेत; परंतु इथं त्यांचा गंधही नाहीं. तुम्ही आधुनिक यंत्रसामुग्री कां नाहीं आणीत?"

'कशाबद्दल म्हणतोस तूं?" जेलरनं विचारलं.

"गेल्या वीस वर्षांत इथं कांहींच बदल झालेला दिसत नाहीं!" तो कैदी म्हणाला, "वीस वर्षांपूर्वी मी इथं असतांना जसं होतं तसंच आहे सारं! आजही मला हातानंच खडी फोडावी लागते!"

*

## खात्री करून घेतों ! १०४

एकदां दोन प्रख्यात खिसेकापू रस्त्यावरून चालले होते. त्यांपैकीं एकजण मधून मधून आपला खिसा चांचपीत होता आणि मध्येंच खिशांतून एक घड्याळ काढून त्याकडे पाहून तें परत खिशांत ठेवीत होता. वाटेंत सारखा त्याचा हा उद्योग चालू होता. त्याच्या मित्राला त्याच्या ह्या वागण्याचं आश्चर्य वाटून त्यानं विचारलं, "काय रे, झालं काय तुला ? सारखा घड्याळाकडे काय बघतोस ! बंद पडलंय कीं काय तें पहातोस कीं वेळ पहातोस ?"

"अरे, मला वेळ काय करायची आहे ?" तो म्हणाला, "तूं बरोबर आहेस म्हणून जरा मधून मधून तें खिशांत आहे की नाहीं ह्याची खात्री करून घेतों !"

## तिचीच भीति कां वाटते ? १०५

"बाबा, तुम्हांला गाईची भीति वाटते का हो ?"

"नाहीं."

"वाघाला आणि सिंहाला पाहून भीति वाटत नाहीं का तुम्हांला ?"

"नाहीं."

"विजा चमकत असतांना, मेघांचा गडगडाट होत असतांना नाहीं का भीति वाटत तुम्हांला ?"

"नाहीं. मुळींच नाहीं." बाप हसून म्हणाला.

"मग भुतांची तरी ?"

"नाहीं."

"जगांतल्या कोणत्याच प्राण्याची भीति वाटत नाहीं ना तुम्हांला ?"

"नाहीं." बाप पुन्हा हंसत म्हणाला.

"मग आईचीच भीति कां वाटते हो तुम्हांला ?"

★

## जास्त मुलं असतीं तर ! १०६

बन्याचा वार्षिक परीक्षेचा निकाल पाहून त्याचे वडील भयंकर भडकले. त्याची चांगली हजेरी घेऊन झाल्यावर प्रगतिपुस्तक त्याच्या पुढं धरीत ते म्हणाले, "गाढवा, एवढा मोठा बैल झालास तरी तुला लाज वाटत नाहीं ? शाळेंत अभ्यास करायला जातोस कीं हजामती करायला ? अठ्ठावीस मुलांच्या वर्गांत तुझा शेवटचा नंबर ? तुला कांहीं वाटत कीं नाहीं ?"

"तुम्हांला वाटतं तितका कांहीं वाईट नाहीं माझा नंबर !" बन्या म्हणाला.

"गाढवा, पुन्हां तोंड घेऊन बोलतोस?" त्याचे वडील कडाडले.

"अठ्ठावीस मुलं वर्गांत होतीं म्हणून!" बन्या शांतपणानं म्हणाला, "आणि समजा, वर्गांत पन्नास मुलं असतीं तर? त्या मानानं अठ्ठाविसावा नंबर वाईट आहे का?"

★

## संधीच मिळत नाहीं! १०७

साखरपुडा झाल्यापासून बनीचा भावी पती तिला भेटण्यासाठीं म्हणून रोज तिच्या घरीं येऊं लागला. पण दोघंही जरा लाजऱ्या स्वभावाचीं पडल्यामुळं बाकीची मंडळी थट्टा करतील ह्या भीतीनं त्यांना इतरांसमोर एकमेकांशीं बोलायला कसंसंच वाटूं लागलं. शेवटीं मनसोक्त बोलायला मिळावं म्हणून तीं दोघं एका खोलींत दरवाजा बंद करून बसूं लागलीं.

एक दिवस बनीच्या भावी यजमानानं तिच्या आठ वर्षांच्या लहानग्या भावाला विचारलं, "काय रे, मी आणि तुझी ताई खोलींत बसून काय करतों हें तुला पहावंसं वाटत नाहीं का?"

"वाटतं तर!" तो चटकन् म्हणाला.

"मग तूं दाराच्या फटींतून कधीं पहातोस कीं काय?" त्यानं मुद्दाम विचारलं.

"नाहीं हो! मला संधीच मिळत नाहीं!" तो हिरमुसला चेहरा करीत म्हणाला, "आई, मनी, मन्या वगैरे सारखीं आळीपाळीनं पहात असतात ना!"

★

## पहिलं बक्षिस! १०८

छोटूनं शाळेंतून घरीं येतांच आपल्या आईच्या गळ्याला मिठी मारली आणि आनंदानं म्हटलं, "आई, मला आज शाळेंत पहिलं बक्षिस मिळालंय!"

"बक्षिस?" आईनं विचारलं," कुठं आहे, बघूं."

छोटूनं लगेच एक पुस्तक तिला दाखवित म्हटलं, "हें बघ."

"पण कशाबद्दल तुला बक्षिस मिळालंय?"

"आज आमच्या शाळेंत एक पाहुणे आले होते. त्यांनीं आमच्या वर्गांत येऊन प्रश्न केला, 'शहामृगाला पाय किती?' मी उत्तर दिलं तीन!"

"पण शहामृगाला पाय दोनच असतात की!" त्याची आई म्हणाली.

"तें मला नंतर समजलं." छोटू म्हणाला, "पण बाकीच्या साऱ्या मुलांनीं चार पाय असतात म्हणून सांगितल्यामुळं माझंच उत्तर जवळचं निघालं!"

★

## शेवटच्या— १०९

इतिहासाच्या मास्तरांनीं अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वीं मुलांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. दोन-चार जणांना प्रश्न विचारून झाल्यावर त्यांनीं दाम्याला प्रश्न केला, "दाम्या, आतां तूं सांग बघूं, बाजीप्रभु देशपांडे 'मी माझं कर्तव्य बजावलं, आतां मी सुखानं मरेन' असं कुठच्या लढाईंत म्हणाला?"

"त्याच्या शेवटच्या लढाईंत!" दाम्या चटकन् म्हणाला.

★

## कुणीच घेणार नाहीं! ११०

नेहमींप्रमाणं मोलकरीण मुलाला फिरायला घेऊन निघालेली पाहून मालकीण तिला म्हणाली, "हें बघ सखू, मुलाकडे जरा लक्ष ठेव. त्याला दुसऱ्या कुणाकडे देऊं नकोस."

"त्याची नको काळजी, बाईसाहेब." सखू म्हणाली, "मी कधींच मुलाला दुसऱ्याकडे देत नाहीं."

"कालच मी घरीं येतांना पाहिलं कीं एक रामा

गडी त्या शेजारच्या यशोदाबाईंच्या मुलाचं चुंबन घेत होता!" मालकीण म्हणाली.

"माझ्या बाबतींत तसं मुळींच व्हायचं नाहीं!" सखू म्हणाली, "मी असतांना तुमच्या मुलाचं कोण चुंबन घेईल?"

★

## विषयच नको! १११

बाताडे आणि थापाडे आपआपल्या पत्नीचं कौतुक करीत होते. बाताडेची पत्नी समाजवादी पक्षाची प्रमुख कार्यकर्ती होती तर थापाडेची पत्नी कम्यूनिस्ट पक्षाची आधारस्तंभ होती.

बाताडे म्हणाला, " अरे, तुला माहित नाहीं माझी बायको. कोणत्याही विषयावर केव्हांही बोलूं शकते!"

"त्यांत कसलं आश्चर्य? हें तर कांहींच नाहीं." थापाडे उपहासानं म्हणाला, " अरे, माझ्या बायकोला बोलायला मुळीं विषयच लागत नाहीं!"

★

## त्याची इच्छाशक्ति ! ११२

मंजुळाबाईनीं नुकतीच एक तरुण स्वयंपाकीणबाई कामावर ठेवली होती. ती कामावर आल्यापासून मंजुळाबाईना चांगलाच आराम मिळत होता.

एक दिवस ती बाई मंजुळाबाईकडे येऊन तक्रार करूं लागली, " बाईसाहेब, आतां सहन होत नाहीं मला ! "

" काय झालं ? कुणी त्रास दिला का तुला ? " मंजुळाबाईनीं विचारलं.

" होय." ती त्रासून म्हणाली, " मालक सारखे त्रास देतात मला ! "

" अग, त्यांचं काय घेऊन बसली आहेस ? त्यांना संवयच आहे मुळीं तशी ! " मंजुळाबाई समजावणीच्या स्वरानं म्हणाल्या, " अग, मी जेव्हां स्वयंपाक करीत असें तेव्हां मलासुद्धां ते सारखे त्रास देत असत. पण मी इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांना गप्प केलं ! तूं जरा इच्छाशक्ति वापरून बघ ! "

" पण बाईसाहेब, त्यांची इच्छाशक्ति भलतीच आहे त्याला काय करूं ? "

★

## धांवतच जाईन ! ११३

भोपळे मास्तरांचा स्वभाव फारच रागीट होता. जराशा कारणावरूनही ते विद्यार्थ्यांवर भयंकर रागवत असत आणि प्रसंगीं त्यांना झोडूनही काढीत असत. त्यामुळं मुलांना ते काळासारखे वाटत असत.

एक दिवस भोपळे मास्तर विज्ञानाचे धडे शिकवीत होते. एकादा माणूस नदींत बुडत असला तर त्याला कसा वर काढावा, त्याच्या पोटांत गेलेलं पाणी कसं बाहेर काढावं आणि नंतर कोणते उपचार करावे ह्याची मुलांना इत्थंभूत माहिती सांगून झाल्यावर ते एका मुलाला म्हणाले, "शहाणे, आतां तूं सांग बघूं. समज मी नदींत बुडत आहें आणि तूं कांठावर उभा आहेस. तुला चांगलं पोहतां येतं. मला बुडतांना पाहून तूं काय करशील ?"

"मी···मी ?" शहाणे कांहींसा गोंधळल्यासारखा झाला; पण लगेच तो चटकन् म्हणाला, "मी धांवतच शाळेंत जाईन सर्वांना आनंदाची बातमी सांगायला !"

★

## मी एकट्यानंच नाहीं— ११४

वसंत अगदींच मठ्ठ डोक्याचा विद्यार्थी होता. मास्तरानं कधीं घरून कांहीं लिहून आणायला सांगितलं कीं तो कधींच बरोबर लिहून आणीत नसे. किती तरी चुका असायच्या त्यांत. एक दिवस त्यानं बऱ्याच चुका केलेल्या पाहून मास्तर भयंकर भडकले आणि त्याला म्हणाले, " गाढवा, ह्या चुका आहेत कीं काय आहे? एकाकडून एवढ्या चुका होतील तरी कशा?"

"पण मास्तर, ह्या मी एकट्यानं केलेल्या चुका नाहींत." वसंत शांतपणानं म्हणाला, "आईची आणि बाबांचीही भागीदारी आहे त्यांत!"

★

## बंधुप्रेम! ११५

मास्तर वर्गांत "भूतदया आणि विश्वप्रेम" ह्यावर बोलत होते, "—माणसानं प्रत्येक प्राणिमात्राकडे भूतदयेनं पाहिलं पाहिजे. आपणाला कुणी त्रास दिला कीं जसं आपणाला दुःख होतं तसंच आपण दुसऱ्याला त्रास दिला कीं त्यालाही दुःख होतं हें आपण विसरतां कामा नये. विश्वांतील सारे प्राणिमात्र

हे आपलेच बंधु आहेत असं मानून आपण त्यांच्यावर प्रेम केलं पाहिजे." एवढं सांगून झाल्यावर आपण काय बोललों ह्याचं ते स्पष्टीकरण करूं लागले, "समजा, मी रस्त्यानं जात आहें. वाटेंत कांहीं इसम एका गाढवाला क्रूरपणं मारीत असलेले मी पाहिले. मला त्या गाढवाची दया येऊन मी त्या गाढवाची त्या क्रूर इसमांपासून सुटका केली तर मी काय केलं? माझ्या अंगचा कोणता गुण प्रकट झाला, सांगा बघूं."

"बंधुप्रेम!" एक वात्रट मुलगा चटकन् म्हणाला.

★

## कसं सहन होईल! ११६

नारोपंतांनीं म्हातारपणीं एका कॉलेज तरुणीशीं लग्न केलं. परंतु लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं त्यांना आपल्या पत्नीच्या वर्तनाचा संशय येऊं लागला. आपल्या पत्नीचं दुसऱ्या कुणावर तरी प्रेम आहे असं त्यांना वाटूं लागलं. आपला संशय खरा कीं खोटा तें पहाण्यासाठीं म्हणून त्यांनीं एक नवीन नोकर घरांत ठेवला आणि त्याला आपल्या पत्नीवर सक्त पाळत ठेवण्याची कामगिरी दिली.

एक दिवस त्यांना अचानक बाहेर गांवीं जावं लागलं. जाण्यापूर्वीं त्यांनीं हळूच नोकराला एका बाजूला नेऊन आपल्या गैरहजेरींत पत्नीला कोण कोण भेटायला येतो हें पहाण्यास सांगितलं आणि ते निघून गेले.

दोन दिवसांनीं बाहेर गांवाहून परत आल्यावर नारोपंतांनीं नोकराला गुपचुप एका बाजूला नेऊन विचारलं, "काय रे, बाईसाहेबांना भेटायला कोण आला होता काय?"

"होय, साहेब. एक जण आला होता." नोकर म्हणाला.

"कोण आला होता?"

"एक तरुण इसम आला होता."

"अस्सं!" नारोपंत दांतओठ चावीत म्हणाले, "बरं पण तूं काय काय पाहिलंस?"

"साहेब, तें सहन होणार नाहीं तुम्हांला!"

"तुला नको त्याची काळजी. सांग तूं."

"पहिल्या प्रथम तीं दोघं दिवाणखान्यांत बसून प्रेमाच्या गोष्टी करूं लागलीं. पण साहेब, पुढचं तुम्हांला ऐकवणार नाहीं."

" सर्व कांहीं ऐकायची ताकद आहे मला. सांग तूं ! "

"तर मग ऐका, साहेब !" नोकर सांगू लागला, त्यांच्या गप्पागोष्टी चालू असतांनाच त्यांच्या प्रेमचेष्टा सुरू झाल्या. आणि पुढं पुढं........!"

"पुढं काय झालं ?" नारोपंतांनीं उत्सुकतेनं विचारलं.

" साहेब, पुढचं तुम्हांला सहन होणार नाहीं !"

" सारं सारं कांहीं सहन होईल मला. सांग लवकर. "

" पण साहेब, मला सहन झालं नाहीं !" नोकर चटकन् म्हणाला, " मला माझ्या घरीं धांव घ्यावी लागली ! "

★

## त्रास होतो पण– ११७

एकदां बन्यानं आपल्या वडिलांबरोबर आत्याच्या घरीं जाण्याचा हट्ट धरला. कांहीं केल्या जेव्हां बन्या हट्ट सोडी ना तेव्हां त्याचे वडील म्हणाले, " ठीक आहे. मी नेतों तुला माझ्याबरोबर; पण एक अट आहे. तिथं अगदीं शिष्टाचारानं वागलं पाहिजे. हावरेपणानं वागायचं नाहीं. समजलं ना ? आहे कबूल ? "

बन्या कबूल झाला आणि वडिलांबरोबर निघाला.

बन्याला बऱ्याच दिवसांनीं आलेला पाहून आत्यानं त्याच्यासाठीं मुद्दाम केक मागवले. बन्याला केक फार आवडत असत. पण वडिलांच्या भीतीनं त्यानं फक्त एकच केक खाल्ला आणि तो केककडे पहात गप्प बसला. आत्याला त्याच्या ह्या वागण्याचं आश्चर्य वाटून तिनं विचारलं, " काय रे, आज झालंय काय तुला ? आणखी घे की केक ! "

" नको ! " बन्या म्हणाला.

" कां रे ? " आत्यानं विचारलं, " अजीर्णाचा त्रास होतो कीं काय ? "

" अजीर्णाचा नाहीं ग; " बन्या म्हणाला. " पण तुमचा शिष्टाचार कीं काय म्हणतात ना, त्याचा मात्र त्रास होतोय मला ! "

★

## आणखी आणायला जातों ! ११८

चंद्रिकेचं चकोरवर फार प्रेम होतं. आपलं त्याच्यावर प्रेम आहे हें उघड करून दाखवण्याची संधी ती कधीं वाया दवडीत नसे. एक दिवस चकोर तिला भेटायला येतांना एक गुलाबाचं फूल घेऊन

आला. त्यानं दिलेलं फूल घेऊन ती लाडीकपणं म्हणाली, " अहा, किती सुंदर ! "

" आवडलं का तुला ? " चकोरनं विचारलं.

" तुम्ही दिलेली भेट मला आवडणार नाहीं असं कधीं झालंय का ? " असं म्हणून तिनं चकोराचं चटकन् एक चुंबन घेतलं—

—त्याबरोबर चकोर एकदम उठून उभा राहिला आणि बाहेर चालूं लागला.

चंद्रिकेला वाटलं, आपण चुंबन घेतलं म्हणून रागानं तो जातो आहे. त्याबरोबर तिनं काकुळतीनं विचारलं, " कुठं निघालांत आपण ? "

" आणखी गुलाब आणायला ! " चकोर चटकन् म्हणाला.

☆

## म्हातारा इतुका न मी—! ११९

चौपाटीवरच्या रेतींत बसून गप्पा मारणं हा त्या तीन वृद्ध इसमांचा ठराविक कार्यक्रम होता. एक दिवस त्यांच्या मरण्यावर गप्पा चालल्या होत्या. बरीच चर्चा झाल्यावर त्यांपैकीं ७० वर्षांचा एक वृद्ध म्हणाला, " आजारी पडून कित्येक महिने बिच्छान्याला खिळून

मरण्यापेक्षां एकाएकीं तडकाफडकीं मरणंच मी पसंत करीन. म्हणून मी अत्यंत वेगानं धांवणाऱ्या मोटारच्या अपघातांत सांपडून मरणं पसंत करतों !"

त्याबरोबर ८० वर्षांचा दुसरा वृद्ध म्हणाला, "मलाही अशाच प्रकारचं मरण आवडतं. पण मी मोटर अपघातापेक्षां विमान अपघातच जास्त पसंत करीन !"

"पण ह्यापेक्षां माझी कल्पना जास्त चांगली आहे !" ९० वर्षांचा तिसरा वृद्ध म्हणाला, "अशा अपघातांत मरण्यापेक्षां मी एका सुंदर नवजवान स्त्रीच्या नवऱ्याच्या पिस्तुलानंच मरणं जास्त पसंत करीन !"

★

## ताजी बातमी ! १२०

मगनलाल छगनलाल आपल्या दुकानाची साफसफाई करीत होता. इतक्यांत चांगले कपडे घातलेला एक सुशिक्षित इसम दुकानांत शिरला. त्याला पहातांच साफसफाईचं काम बाजूला ठेवून मगनलालनं पुढं होऊन विचारलं, "या साहेब ! काय पाहिजे आपणाला ?"

"मला एक छानशी छत्री पाहिजे !" तो इसम म्हणाला.

"छत्री?" मगनलाल कांहींसा आश्चर्यानें म्हणाला. पावसाळ्याला तर अजून चारपांच महिने अवकाश होता. एवढ्या लवकर छत्री खरेदी करणाऱ्या त्या गिऱ्हाईकाबद्दल कुतूहल वाटून मगनलालनं एक उत्तमपैकीं छत्री त्याला दाखवीत विचारलं, "काय साहेब, पाऊस पडणार अशी बातमी आपणाला अगोदरच समजली आहे काय?

"नाहीं." तो इसम छत्री पारखीत म्हणाला, "पण मला नुकतीच रशियाची बातमी कळली आहे कीं सध्यां तिथं पाऊस पडत आहे!"

७१४७
REFBK-0007147